# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४०** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- २९४** **दिनांक :- ११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.१३/०६/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३९ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.१३/०६/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३९ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.१३/०६/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३९ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४०** **(महासभा)**

---

**विषय क्र.:- ०२** **प्रशासक ठराव क्र.:- २९५** **दिनांक :- ११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडिल जा.क्र./आस्था/९११/२०२५ दि.२६/०६/२०२५

३. आस्थापना अधिक्षक यांचा दि.२३/०६/२०२५ चा अभिप्राय

४. उपायुक्त यांचा दि.२५/०६/२०२५ चा अभिप्राय

५. आयुक्त यांचा दि.२६/०६/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** श्री.मन्सुर ईस्माईल तडवी,लिपीक, नवी मुंबई महानगरपालिका यांचे विनंतीनुसार जळगांव शहर महानगरपालिकेतील लिपीक संवर्गातील रिक्त पदावर कायमस्वरुपी बदलीने समावेशन करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

श्री.मन्सुर ईस्माईल तडवी,लिपीक, नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अनुसूचित जमाती (एस.टी.) या प्रवर्गात दि.१४/०६/२०१३ पासून लिपिक/टंकलेखक या पदावर शिक्षण विभाग येथे कार्यरत असून त्यांची ११ वर्ष सेवा पूर्ण झालेली आहे. त्यांची पत्नी तहसिल (महसुल) कार्यालय अंतर्गत परसाडे ता.यावल जि.जळगांव येथे तलाठी या पदावर कार्यरत असून मुलांचे पालण-पोषण व शैक्षणिक जबाबदारी असल्याचे व वयोवृध्द आई-वडील असल्याने त्यांचे आजारपणाची जबाबदारी असल्याचे विनंती अर्जात नमुद आहे. तसेच सामान्य प्रशासन शासन निर्णय क्र.एसआर व्ही २०१६/प्र.क्र.५०९/कार्या-१२ दिनांक १५ मे २०१९ पती पत्नी एकत्रीकरण संबंधीचे धोरण व मानवतावादी दृष्टीकोन व सहानुभूती पुर्वक विचार करुन जळगांव येथे लिपीक/टंकलेखक या पदावर कायमस्वरुपी बदलीने सेवा वर्ग करावी अशी विनंती केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि.१५ मे २०१९ व दि.३० मार्च २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये आपण प्रथमत: जळगांव शहर महानगरपालिकेत सेवा वर्ग करणेबाबत अर्ज सादर करावा. जळगांव म.न.पा. त्यांचे आस्थापनेवर सेवा वर्ग करणेस तयार असल्यास पुढील कार्यवाही करणे शक्य होईल असे उपायुक्त (प्रशासन), नवी मुंबई महानगरपालिका यांचे दिनांक ०१/०४/२०२५ च्या पत्रात नमुद आहे.

तरी जळगांव शहर महानगरपालिकेतील मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेता तसेच अर्जदार यांची निकड पाहता श्री.मन्सुर ईस्माईल तडवी यांची नवी मुंबई मनपा येथून जळगांव मनपा येथे बदलीने सेवा वर्ग करुन घेणेस हरकत नसावी. त्याकरीता महासभा/प्रशासकीय ठराव आवश्यक असुन ठराव झाले नंतर नवी मुंबई महानगरपालिकेस ना-हकरत दाखला (NOC) देवून शासन निर्णय :- साप्रवि दिनांक १५ मे २०१९ मधील तरतूदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

त्याअनुषंगाने श्री.मन्सुर इस्माईल तडवी यांना शासन निर्णय :- साप्रवि दिनांक १५ मे २०१९ मधील तरतूदीनुसार जळगांव शहर महानगरपालिकेतील रिक्त असलेल्या लिपीक पदावर कायमस्वरुपी सामावुन घेणेस तयार असल्याचे पत्र /NOC/नवी मुंबई महानगरपालिकेस देणेकामी मान्यता मिळण्यासाठी आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशीर अडचणी येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४०** **(महासभा)**

**विषय क्र.:-** ०३ **प्रशासक ठराव क्र.:-** २९६ **दिनांक :- ११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडिल जा.क्र./आस्था/१०१२/२०२५ दि.१०/०७/२०२५
३. आस्थापना अधिक्षक यांचा दि.०२/०७/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि. ०३/०७/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि. ०९/०७/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** श्रीमती शितल प्रकाश शंभरकर यांची जळगांव शहर महानगरपालिका येथुन परळी वै. नगरपरिषद, जि.बीड आस्थापनेवर वरिष्ठ लिपीक वेतन श्रेणी २५५००-८११०० संवर्गातील समकक्ष पदावर बदलीने नेमणूक देणेकामी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत

---

वाचा क्र.१ व आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

श्रीमती शितल प्रकाश शंभरकर, लिपीक यांनी परळी वै.नगरपरिषदेत असलेल्या वरिष्ठ लिपीक वेतन श्रेणी २५५००-८११०० संवर्गातील समकक्ष रिक्त पदावरील जागी बदलीने नेमणूक देणेबाबत ना-हरकत पत्र मिळणेस व त्याबाबत मनपा सभेचा निर्णय घेवुन तसा ठराव पारीत करुन मिळण्याची विनंती केली आहे.

शितल प्रकाश शंभरकर या जळगांव शहर महानगरपालिकेत दि.०९/११/२०१२ च्या आदेशान्वये अनु.जाती प्रवर्गातून लिपीक या पदावर कार्यरत आहेत. श्रीमती शंभरकर यांचे पती श्री.रवी राजेंद्र भालेराव हे औष्णिक विदयुत केंद्र, परळी वै.येथे कार्यरत आहे. तसेच त्यांचे सासरे श्री.राजेंद्र भालेराव यांना हृदयविकार असुन त्यांचेवर वैदयकीय उपचार सुरु आहेत. त्यामुळे श्रीमती शंभरकर यांनी परळी नगरपरिषदेत असलेल्या वरिष्ठ लिपीक वेतन श्रेणी २५५००-८११०० संवर्गातील समकक्ष रिक्त पदावरील जागी बदलीने नेमणूक देणेबाबत ना-हरकत पत्र मिळणेस व त्याबाबत म.न.पा. सभेचा निर्णय घेऊन तसा ठराव पारीत करुन मिळण्याची विनंती केली आहे.

श्रीमती शितल प्रकाश शंभरकर यांचा मनपा सेवेचा कार्यकाळ सुमारे १२ वर्षाचा झाला असुन त्यांचे विनंती अर्जानुसार जळगांव शहर महानगरपालिका येथुन परळी नगरपरिषद येथे शासन नियमानुसार विहित बाबींची पूर्तता करणेस अधीन राहून आंतरजिल्हा बदली करणेस ना-हरकत दाखला देणेस मान्यता मिळण्यासाठी आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशीर अडचणी येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.४०** **(महासभा)**

**विषय क्र.:-** ०४ **प्रशासक ठराव क्र.:-** २९७ **दिनांक :- ११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. कार्यकारी कर अधिक्षक, किरकोळ वसुली विभाग यांचेकडिल जा.क्र./कि.व./९१७/२०२५-२६ दि.२७/०६/२०२५
३. उपायुक्त (महसुल) यांचा दि.२५/०६/२०२५ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.२५/०६/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.२६/०६/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने महानगरपालिका मालकीच्या जाहीरात होर्डिंग उभारणेकामी निश्चित केलेल्या जागांवर जाहिरात होर्डिंग स्ट्रक्चर उभारुन महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरांनुसार जाहिरात जमिनभाडे व जाहिरात परवाना फी आधारभूत रक्कम मानून, सदर रकमेकरीता लिलाव करुन, लिलावा अंती जो दर निश्चित होईल अशा दरानुसार जाहिरात जमिनभाडे व जाहिरात परवाना फी महानगरपालिकेत भरण्याच्या व महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून व्यावसायीक किंवा अन्य कोणत्याही जाहिरात प्रदर्शीत करण्याचा हक्क ०५ वर्षाकरीता (स्ट्रक्चर उभारणीचा कालावधी वगळता) देणेसंदर्भात, तसेच विहित मुदतीनंतर (०५ वर्षानंतर) सदरचे होर्डिंग स्ट्रक्चर सुस्थितीत पुनश्च: महानगरपालिकेच्या ताब्यात देण्याच्या अधिन राहुन अभिकर्ता नेमणेकामी जाहिर निविदा प्रसिध्द करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व कार्यकारी कर अधिक्षक, किरकोळ वसुली विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रात मोठया प्रमाणावर खाजगी मिळकतीं वरील होर्डिंगवर जाहिरात फलक/बॅनर/पोस्टर्स प्रदर्शीत करण्यात येतात. सदर होर्डिंग्ज धारकांकडून महानगरपालिकेस फक्त जाहिरात परवाना फी वसुल करण्यात येते. सदर होर्डिंगधारक जाहिरात प्रदर्शीत करणाऱ्यांकडून जी फी आकारतात त्यानुसार महानगरपालिकेस जाहिरात परवाना फी पासून मिळणारे उत्पन्न अल्प आहे. तसेच सदर होर्डिग्ज हे खाजगी मालमत्तांवर असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्कायसाईन) व जाहिरात प्रदर्शीत करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम-2022 मधील तरतूदीनूसार परवाना फी दराबाबत मर्यादा येतात.

त्यामुळे जळगांव शहर महानगरपालिकेचा महसुल वाढविणेच्या उद्देशाने जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यावरील वाहतूक बेट, रस्त्याच्या कडेस तसेच म.न.पा. मालकीच्या मालमत्तेवर तसेच जागांवर कोणतीही व्यक्ती, प्रोपरायटर, फर्म किंवा कंपनी, प्रा. लि. कंपनी, जाहिरातदार संस्था/एजन्सीज इत्यादी कडून महानगरपालिका मालकीच्या वरील नमूद मालमत्तांवर उपलब्ध जागेनुसार, महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे(स्कायसाईन) व जाहिरात प्रदर्शीत करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम-2022 मधील तरतूदीनुसार विहीत नियमावलीनुसार विविध जाहिरात माध्यमांची स्ट्रक्चरची इत्यादींची स्वखर्चाने उभारणी करुन, महानगरपालिका ठरवून देईल त्या दराने जाहिरात जमिनभाडे व जाहिरात परवानाफी भरण्याच्या अधिन राहून व्यावसायीक किंवा अन्य कोणत्याही जाहिरात प्रदर्शीत करण्याचा हक्क 05 वर्षाकरीता देणे कामी अभिकर्ता नेमल्यास जळगांव शहर महानगरपालिकेस मोठया प्रमाणात महसुल प्राप्त होवू शकतो. त्यामुळे जाहिरात प्रदर्शना संदर्भात एकसुत्रता येवून शहर विद्रुपीकरणास प्रतिबंध देखील होईल.

जाहिरात फलक /होर्डिंग्ज उभारणे कामी योग्य अशा जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या जागांचा खालीलप्रमाणे तपशील नगररचनाकार यांनी उपायुक्त(महसुल) यांचेकडेस सादर केलेला आहे. त्याच प्रमाणे विभागामार्फत देखील जाहिरात फलक /होर्डिंग्ज उभारणे कामी योग्य अशा जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या जागांचे सर्व्हेक्षण करण्यात आलेले आहे. सदर दोन्ही सर्व्हेक्षणाअंती सदर जागेवर जाहिरातीस मिळणारा प्रतिसाद, सदर जागेची भौगोलीक स्थिती तसेच संबधीत मालमत्तेचे विद्रुपीकरण होणार नाही याची दक्षता घेवून खालील प्रमाणे 24 जागांवर होर्डींग संख्या निश्चित करणे आवश्यक राहील.

# परिशिष्ट- अ

| अ.क्रं. | ठिकाण | दिशा | क्षेत्रफळ चौ.मी. | नग | वर्गवारी | प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | भोईटे हायस्कूल | उत्तर | 30x30 | 2 | अ | डिजिटल डिस्प्ले / होर्डिग |
| | | पश्चिम | 20x20 | 2 | | डिजिटल डिस्प्ले / होर्डिग |
| 2 | बहिणाबाई उद्यान | पूर्व | 30x30 | 3 | अ | डिजिटल डिस्प्ले / होर्डिग |
| | | पश्चिम | 30x30 | 2 | | होर्डिग |
| | | दक्षिण | 30x30 | 3 | | होर्डिग |
| 3 | सागर पार्क | पूर्व | 20x20 | 3 | अ | डिजिटल डिस्प्ले / होर्डिग |
| | | उत्तर | 30x30 | 3 | | होर्डिग |
| 3 | सागर पार्क | पूर्व | 20x20 | 3 | अ | डिजिटल डिस्प्ले / होर्डिग |
| | | उत्तर | 30x30 | 3 | | होर्डिग |
| 4 | भाऊचे उद्यान (काव्यरत्नावली चौक) | उत्तर | 30x30 | 2 | अ | डिजिटल डिस्प्ले / होर्डिग |
| | | पश्चिम | 20x20 | 2 | | होर्डिग |
| 5 | शामा प्रसाद मुखर्जी उद्यान | पूर्व | 20x20 | 2 | अ | होर्डिग |
| | | उत्तर | 30x30 | 2 | | होर्डिग |
| 6 | जुनी नगरपालिकेची जागा (सध्या पार्किंग करीता) | पूर्व (बाहेरून) | 20x20 | 3 | अ | डिजिटल डिस्प्ले / होर्डिग |
| | | पश्चिम | 20x20 | 3 | | होर्डिग |
| | | उत्तर (आतून) | 20x20 | 4 | | होर्डिग |
| | | दक्षिण | 20x20 | 4 | | होर्डिग |
| 7 | सानेगुरुजी दवाखान्याची जागा (सध्यापार्किंग करीता) | उत्तर | 20x20 | 4 | अ | डिजिटल डिस्प्ले / होर्डिग |
| | | दक्षिण | 20x20 | 4 | | होर्डिग |
| 8 | टॉवर चौक (शहर पोलीस स्टेशनच्या पश्चिमेस व गांधी साहित्य भांडारच्या दक्षिणेस) | - | 15 x 15 | 1 | अ | डिजिटल डिस्प्ले / होर्डिग |
| 9 | महात्मा गांधी उद्यान FCG राम मंदीर | - | 30 x 30 | 1 | अ | डिजिटल डिस्प्ले / होर्डिग |
| 10 | आकाशवाणी चौक तापी पाटबंधारे कार्यालया जवळ इच्छादेवी चौकाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेस | - | 15X 30 | 1 | अ | होर्डिग |
| 11 | ईच्छादेवी सर्कल पोलीस चौकीला लागुन FCG आकाशवाणी चौक | - | 30X40 | 1 | अ | होर्डिग |
| 12 | शिवाजी नगर शाळा क्र.01 शिवाजी नगर पुला जवळील | दक्षिण | 30x30 | 2 | ब | होर्डिग |
| 13 | गिरणा वॉटर टँक | पूर्व | 30x30 | 2 | ब | होर्डिग |
| | | दक्षिण | 30x30 | 2 | | होर्डिग |
| | | पश्चिम | 30x30 | 2 | | होर्डिग |
| 14 | वैकुंठधाम स्मशानभूमी | पश्चिम | 30x30 | 2 | ब | होर्डिग |
| 15 | ख्वॉजामियॉ चौकातील महानगरपालिकेची जागा | दक्षिण | 30x30 | 5 | ब | होर्डिग |
| | | पश्चिम | 30x30 | 5 | | होर्डिग |
| 16 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान | उत्तर | 30x30 | 2 | ब | होर्डिग |
| | | पश्चिम | 20x20 | 2 | | होर्डिग |
| 17 | रेल्वे स्टेशन शिवाजीनगर पुलाच्या शेवटी अनमोल स्टील समोर | - | 15 x 20 | 1 | ब | होर्डिग |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 18 | शाहु महाराज हॉस्पिटलच्या दक्षिणेस गेटच्या उजव्या बाजुस | - | 10X15 | 3 | **ब** | **डिजिटल डिस्प्ले / होर्डिग** |
| 19 | पांडे डेअरी चौक रस्त्याच्या कडेस पोस्ट ऑफिसच्या भिंतीला लागुन | - | 10X10 | 1 | **ब** | **होर्डिग** |
| 20 | सिंधी कॉलनी चौक वाहतुक बेट/ डिव्हाईडरवर | - | 10X15 | 2 | **ब** | **होर्डिग** |
| 21 | म.न.पा. शाळा पिंप्राळा (निमडीशाळा) | पश्चिम | 20x20 | 2 | **क** | **होर्डिग** |
| 22 | रामदास कॉलनी उद्यान | उत्तर | 30x30 | 2 | **क** | **होर्डिग** |
| | | दक्षिण | 30x30 | 3 | | **होर्डिग** |
| 23 | मनपा कर्मचारी 124 खोल्या सार्वजनिक शौचालयाच्या बाजूस रस्त्याच्या कडेस | - | 15X20 | 1 | **क** | **होर्डिग** |
| 24 | रामानंद नगर बसस्टॉप FCG गिरणा टाकी | - | 20X30 | 1 | **क** | **होर्डिग** |

महानगरपालिका मालकिच्या जागेवर जाहिरातीस मिळणारा प्रतिसाद, सदर जागेची भौगोलीक स्थिती तसेच संबधीत मालमत्तेचे विद्रुपीकरण होणार नाही याची दक्षता घेवून वरील तक्त्यात नमुद 24 महानगरपालिका मालकिच्या जागांवर एकुण 92 जाहिरात होर्डिगस् उभारता येतील, त्यामध्ये परिस्थीती नुसार सदर जागांमध्ये व होर्डिगस् स्ट्रक्चर उभारणेच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट देखील होऊ शकते. परिस्थिती नुसार होर्डिगस् स्ट्रक्चर उभारणे कामी निश्चित केलेल्या जागांमध्ये वाढ किंवा घट करण्याचे सर्वस्वी अधिकार आयुक्त तथा प्रशासक यांना राहील.

त्याअनुषंगाने महानगरपालिकेच्या जागेवर वरील प्रमाणे जाहिरात होर्डिग उभारणेकामी किती खर्च येवू शकतो याबाबत जळगांव शहरातील खाजगी जाहिरातदारांना व शहर अभियंता यांना पत्र देवुन विचारणा केली असता, शहर अभियंता कडून अहवाल अद्यापपावेतो अप्राप्त आहे. तसेच खाजगी जाहिरातदारांकडुन प्राप्त पत्रानुसार महानगरपालिकेच्या जागेवर वरील प्रमाणे जाहिरात होर्डिग उभारणेकामी अपेक्षीत खर्चाची रक्कम परीगणीत केली असता त्यांनी अदमासे खालील प्रमाणे खर्च सुचविलेला आहे.

खाजगी जाहिरातदारांकडून प्राप्त पत्रानुसार जाहिरात होर्डिग उभारणेकामी येणाऱ्या खर्चाचे विवरण

| जाहिरात माध्यामाचा प्रमार | क्षेत्रफळ चौ.फु. | होर्डिगची संख्या | खाजगी जाहिरातदारांच्या पत्रा नुसार अंदाजित खर्च (उभारणीचा) |
|---|---|---|---|
| होर्डिंग स्ट्रकचर जमिनीपासुन साधारण 8 ते 10 फुटापर्यंत | 30 X 30 | 1 | 7,50,000/- |
| | 20 X 30 | 1 | 5,00,000/- |
| | 20 X 20 | 1 | 3,50,000/- |
| | 10 X 20 | 1 | 2,00,000/- |
| डिजिटल जाहिरात संच | 10 X 10 | 1 | 12,50,000/- |

वरील प्रमाणे नमुद केल्यानुसार परिशिष्ठ अ मध्ये नमुद महानगरपालिका मालकीच्या एकुण 92 जागांवर होर्डिंग स्ट्रक्चर उभारणेकामी अंदाजित एकुण रु. 05 कोटी मात्र खर्च येऊ शकतो.

त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्कायसाईन) व जाहिरात प्रदर्शीत करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम- 2022 मधील नियमावलीतील मानकानुसार, व महानगरपालिका निश्चित करेल त्या आराखड्यानुसार विविध जाहिरात माध्यमांची स्ट्रक्चरची इत्यादींची स्वखर्चाने उभारणी करुन, सदर होर्डिंग स्ट्रक्चर उभारणीकामी संबंधीत अभिकर्त्यास येणारा खर्च, सदर जाहिरात होर्डिंग यास मिळणारा प्रतिसाद व अपेक्षित असणारे उत्पन्न, सदरच्या गुतंवणुकीतील अभिकर्त्याचा नफा (साधारण 20 टक्के) व त्यापासून महानगरपालिकेस मिळू शकणारे उत्पन्न याबाबींचा विचार करता परिशिष्ट- अ मध्ये नमुद जागांचे करण्यात आलेले वर्गीकरण (अ,ब,क,) यानुसार महानगरपालिकेने खालिल परिशिष्ट- ब मधील रकाना क्रं. 13 व 14 मध्ये सुचविण्यात आलेल्या अनुक्रमे जाहिरात जमिनभाडे प्रति चौ.फु. प्रति महिना या प्रमाणेचा दर व जाहिरात परवाना फी प्रति महिना प्रति फलक यांचा दर आधारभूत रक्कम म्हणुन निश्चित करणेच्या मान्यतेस्तव सादर.

## परिशिष्ठ-ब

| अ.क्र. | जाहिरातीचा प्रकार | वर्गवारी | क्षेत्रफळ (चौ.फु) | होर्डिंग उभारणी कामी येणारा अंदाजित खर्च | खाजगी जाहिरातदारां कडून आकारणी करण्यात येणारे शुल्क प्रति महिना (अंदाजित, मौखिक माहितीनुसार) | खाजगी जाहिरातदारास सदर होर्डिंग पासून मिळणारे उत्पन्न अंदाजित ०५ वर्षा करीता (अंदाजित) | उभारणीचा खर्च वजा जाता जाहिरातदार यांना अपेक्षित उत्पन्न (अंदाजित) | नफा २० टक्के वजा जाता | जाहिरातदरारास ५ वर्षामध्ये मिळणारा अंदाजित एकुण नफा | जाहिरातदार यांना अपेक्षित उत्पन्न (प्रति महिने) | जाहिरातदार यांना अपेक्षित उत्पन्न (प्रति चौ.फु प्रति महिना ) | रकाना १० नुसार सुचविण्यात आलेले दर (प्रति चौ.फु प्रति महिना ) | सुचविण्यात आलेले जाहिरात परवाना फी दर प्रति फलक प्रति महिना | प्रस्थावित दरानुसार एकुण शुल्क प्रति महिना (जमिन भाडे + परवाना फि) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | जाहिरातदारांचे दर * ६० महिने | रकाना ७ - ५ | रकाना (८)-२०% | रकाना ८-९ | रकाना ९ / ६० महिने | रकाना ९ / क्षेत्रफळ | | | रकाना (११X क्षेत्रफळ) +रकाना १२ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १ | डिजिटल डिस्प्ले | अ | १० * १० | १२५०००० | 23500 | 1410000 | 160000 | 128000 | 32000 | 2134 | 22 | २४ | १००० | ३४०० |
| २ | डिजिटल डिस्प्ले | ब | १० * १० | १२५०००० | NA | NA | NA | NA | NA | NA | NA | २४ | १००० | ३४०० |
| ३ | डिजिटल डिस्प्ले | क | १० * १० | १२५०००० | NA | NA | NA | NA | NA | NA | NA | २४ | १००० | ३४०० |
| ४ | होर्डिंग | अ | २० * २० | ३५०००० | 12000 रु.30/- प्रति स्के.फु. प्रती महिना याप्रमाणे | 720000 | 370000 | 296000 | 74000 | 4934 | 12.335 | १३ | ५०० | ५७०० |
| ५ | होर्डिंग | ब | २० * २० | ३५०००० | 10000 रु.25/- प्रति स्के.फु. प्रती महिना याप्रमाणे | 600000 | 250000 | 200000 | 50000 | 3334 | 8.335 | ८ | ५०० | ३७०० |
| ६ | होर्डिंग | क | २० * २० | ३५०००० | 8000 रु.20/- प्रति स्के.फु. प्रती महिना याप्रमाणे | 480000 | 130000 | 104000 | 26000 | 1734 | 4.335 | ४ | ५०० | २१०० |

वरील प्रमाणे परिशिष्ट- ब मधील रकाना क्रं. 13 व 14 मध्ये सुचविण्यात आलेल्या अनुक्रमे जाहिरात जमिनभाडे प्रति चौ.फु. प्रति महिना या प्रमाणेचा दर व जाहिरात परवाना फी प्रति महिना प्रति फलक यांचा दर आधारभूत रक्कम मानून, सदर रकमेकरीता लिलाव करुन, लिलावा अंती जो दर निश्चित होईल अशा दरानुसार जाहिरात जमिन भाडे व जाहिरात परवाना फी रक्कमेचा भरणा महानगरपालिकेत करणेच्या व ( विहित मुदतीनंतर (05 वर्षानंतर) सदरचे हार्डिंग स्ट्रक्चर सुस्थितीत पुनश्च: महानगरपालिकेच्या ताब्यात देण्याच्या तसेच महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अटीस अधिन राहून व्यावसायीक किंवा अन्य कोणत्याही जाहिरात प्रदर्शीत करण्याचा हक्क 05 वर्षाकरीता देणे संदर्भात अभिकर्त्याची नेमणूक केल्यास, महानगरपालिकेच्या वार्षिक उत्पन्नात अंदाजित रु.1 कोटी वार्षिक वाढ होवून जाहिरात होर्डिंग स्ट्रक्चर देखील महानगरपालिका मालकीचे होवू शकते.

तरी प्रस्तुत प्रकरणी वर नमुद केल्यानुसार जळगांव शहर महानगरपालिकेच्या उत्पन्नवाढीच्या दृष्टीने महानगरपालिका मालकीच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमुद एकुण 24 जागां मधील 92 जाहिरात होर्डिंग पैकी महानगरपालिका मालकिच्या सदर जागेवर जाहिरातीस मिळणारा प्रतिसाद, सदर जागेची भौगोलीक स्थिती तसेच संबधीत मालमत्तेचे विद्रुपीकरण होणार नाही याची दक्षता घेवून अंतीम जागा निश्चित करणे कामी उपायुक्त महसुल, सहाय्यक संचालक नगररचना व शहर अभियंता यांना प्राधिकृत करणेस तसेच उक्त नमुद केल्याप्रमाणे परिशिष्ट "ब" रकाना क्रं. 13 व 14 प्रमाणे ठरवून दिलेल्या दरांनुसार जाहिरात जमिन भाडे व जाहिरात परवाना फी चे दर आधारभूत रक्कम मानून, सदर रकमेकरीता लिलाव करुन, लिलावा अंती जो दर निश्चित होईल अशा दरानुसार जाहिरात जमिन भाडे व जाहिरात परवाना फी रक्कमेचा भरणा महानगरपालिकेत करणेच्या व महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून व्यावसायीक किंवा अन्य कोणत्याही जाहिरात प्रदर्शीत करण्याचा हक्क 05 वर्षाकरीता (स्ट्रक्चर उभारणीचा कालावधी वगळता) देणे संदर्भात, (विहित मुदतीनंतर सदरचे होर्डिंग स्ट्रक्चर पुनश्च: महानगरपालिकेच्या ताब्यात देण्याच्या अधिन राहुन) अभिकर्ता नेमणे कामी जाहिर निविदा प्रसिध्द करणे कामीच्या प्रस्तावास मान्यता मिळण्यासाठी कार्यकारी कर अधिक्षक, किरकोळ वसुली विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशीर अडचणी येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४०** **(महासभा)**

**विषय क्र.:-** ०५ **प्रशासक ठराव क्र.:-** २९८ **दिनांक :- ११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचेकडिल जा.क्र./न.र./४६३/२०२५ दि.०७/०७/२०२५
३. रचना सहाय्यक यांचा दि.०७/०७/२०२५ चा अभिप्राय
४. सहाय्यक नगररचनाकार यांचा दि.०७/०७/२०२५ चा अभिप्राय
५. सहाय्यक संचालक,नगररचना यांचा दि.०७/०७/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.०७/०७/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** मंजुर विकास योजना जळगांव (जु.ह) मधील आरक्षण क्र.१ (H.S & P.G) व २४.०० मी रुंद वि.यो. रस्ता या आरक्षणा खालील जळगांव स.नं.५१०/३, ५१०/५, ५१०/७ चे एकुण क्षेत्र ८५३५.०० चौ.मी. या जमिनींचे भुसंपादन प्रस्ताव रद्द करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मंजुर वि.यो.(जु.ह) नुसार आरक्षण क्र.१ (H.S & P.G) चे एकुण क्षेत्र १३५००.०० चौ.मी या आरक्षणा खालील जळगांव स.नं.५१०/३, ५१०/५, ५१०/७ या जमिनींमधील एकुण क्षेत्र ८५३५.०० चौ.मी आरक्षीत आहेत. या पैकी जळगांव स.नं.५१०/३ (एकूण स.नं. ६३००.०० चौ.मी) च्या जागा मालकांनी दि.०३/०१/२००५ रोजी महापालिकेस म.प्रा व न.र अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये नोटीस बजावली आहे. तद्नंतर विहीत मुदतीत भुसंपादन कार्यवाही न झाल्याने जागा मालक यांनी मे.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन नं.७२१५/२००६ दाखल केलेले होते. या दाव्याचा निकाल दि.३०/०८/२००७ रोजी देण्यात आला असुन प्रतिवादी क्र.२ म्हणजे जळगांव शहर महानगरपालिका यांनी ६ महिन्याच्या आत भुसंपादन कार्यवाही करावी या प्रमाणे न्यायालयाने निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिकेने दि.२९/०२/२००८ च्या पत्रान्वये जळगांव स.नं.५१०/३ चे एकूण क्षेत्र ६३०० चौ.मी च्या संपादना करीता भुसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केला आहे. तद्नंतर महापालिकेने आरक्षणा खालील व २४.० मी रुंद वि.यो रस्त्याखालील जळगांव स.नं. ५१०/३, ५१०/५, ५१०/७ चे एकुण क्षेत्र ८५३५.०० चौ.मी. क्षेत्रा करीता सुधारीत भुसंपादन प्रस्ताव दि.१५/०४/२०१० च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी यांना सादर केला आहे. या सुधारीत प्रस्तावास म.न.पा.ठराव क्र.११०८ दि.१६/०८/२०११ अन्वये मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त जागांचा भुसंपादन प्रस्ताव क्र.९६/०८ मध्ये भुसंपादन कायदा कलम १८९४ मधील तरतुदीनुसार कार्यवाही पुर्ण करण्यात येवुन, उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी यांचेकडील पत्र/जमीन/भुसंपादन/एस.आर/९६/०८/१२ दि.०५/११/२०१२ अन्वये निवाडा घोषित केला आहे.

न्यायनिवाडयात सदरचा जमिनीचे मुल्यदर रु.२८००/- चौ.मी गृहित धरुन भुसंपादनाची रक्कम रु.२,९१,७५,६७८/- ठरविण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने रु.२,६८,३१,५७६/- हि रक्कम अदा करणेत आलेली होती. तदनंतर भुसंपादन अधिकारी यांचेकडील पत्र दि.२९/१०/२०१२ नुसार जमिनिंना सुधारित बाजारमुल्यांप्रमाणे देय रक्कम रु.५२,८१,६४८/- या प्रमाणे रक्कम भरणेबाबत कळविण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे रक्कम भुसंपादन अधिकारी यांना अदा करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | बँकेचे नाव | धनादेश क्र. | दिनांक | जमा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | अलाहबाद बँक | ३९४७७७ | २३/०९/२०१० | रु.७९,५४,२१०/- |
| २ | अलाहबाद बँक | ३९४७९६ | २५/१२/२०११ | रु.७८,१९,४९७/- |
| ३ | अलाहबाद बँक | ०६५४८६ | ०६/०९/२०१२ | रु.१,१०,५७,८६९/- |
| ४ | अलाहबाद बँक | ०६५४९० | १७/११/२०१२ | रु.५२,८१,६४८/- |
| | | | एकुण - | रु.३,२१,१३,२२४/- |

मात्र भुसंपादनाचे निवाडयानुसार संपादनाचे रक्कमेऐवजी वाढीव मोबदला मिळणेकरिता जागामालक यांनी जिल्हा न्यायालयात दावा क्रं.lar ४१६/२०१३ दाखल केलेला होता. या दाव्याच्या निकाल दि.२७/०२/२०२५ रोजी देण्यात आलेला असुन आलेल्या निर्णयात निवाडयानुसारची रक्कम रु.२,९१,७५,६७८/- ऐवजी संपादनाची मोबदला रक्कम रु.१५,०५,२३,२६०/- + नुकसान भरपाई रक्कम + व्याजाची रक्कम अशी एकुण रक्कम रु.३१,२२,२४,३२२/- याप्रमाणे देण्याचे आदेश झालेले आहेत.

न्यायनिवाडयात सदरच्या जमिनीचे मुल्यदर रु.२८००/- चौ.मी गृहित धरुन भुसंपादनाची रक्कम ठरविण्यात आलेली आहे. मात्र प्रस्तृत निर्णयात सदर नुकसान भरपाई ठरवितांना जागामालक यांनी उदारहरणा दाखल न्यायालयात सादर केलेले तीन मालमत्तांपैकी सर्वात जास्त मुल्य दर असलेल्या मालमत्तेचे बाजारमुल्य दर रु.१७,७३६/- प्रति चौ.मी. विचारात घेऊन सदर रक्कम ठरविलेली आहे. जागामालक यांनी उदाहरणा दाखल केलेल्या खरेदी विक्रीचे दस्ताऐवजांमध्ये नमुद तीनही मालमत्ता ह्या शहराच्या मध्यवर्ती व मुख्य बाजारपेठेतील व प्रमुख मोठया रस्त्यावर सन्मुख आहेत. याउलट संपादनाखालील जागा ही शहरापासुन विलग असलेल्या भागातील व अल्पउत्पन्न व मध्यमवर्गीय रहिवासी भागातील अंतर्गत रस्त्यावरील आहेत. त्यामुळे मे. न्यायालयाने मुल्यांकनाकरिता घेतलेल्या मालमत्तांची व संपादनाखालील जमिनी यांची तुलनाच होऊ शकत नाही. त्यामुळे मे.न्यायालयाने ठरवलेली रक्कम अत्यंत अवाजवी आहे.

तसेच उपरोक्त जागा या हायस्कुल व प्लेग्राउंड करिता आरक्षित आहेत व संपादित झालेल्या आहेत. महानगरपालिकेच्या मालकीच्या अस्तित्वातील शाळांची स्थिती लक्षात घेता महानगरपालिकेच्या मालकीच्या काही शाळा चालविण्याकरता गैरसरकारी व सार्वजनिक संस्था (एनजीओ) यांना दयाव्या लागल्या आहेत. तसेच ज्या शाळा कार्यरत आहे त्यामध्ये सुध्दा विदयार्थ्यांची पटसंख्या कमी आहे. त्यामुळे एकंदरित स्थिती पाहता नव्याने शाळा सुरु करण्यासाठी सदयस्थितीत जागेची आवश्यकता नसल्याने उपरोक्त संपादनाखालील जमिनीची जळगांव शहर महानगरपालिकेस कोणतीही आवश्यकता नाही. उपरोक्त जमिनी बाबत असलेली भुसंपादनाची रक्कम रुपये- ३१,२२,२४,३२२/- ही अत्यंत अवाजवी असुन, जळगांव शहर महानगरपालिकेची आर्थिक क्षमता पहाता, एवढी रक्कम भरुन जागा संपादन करणे महापालिकेस शक्य नाही.

भुसंपादन अधिकारी यांचे मार्फत दि.०५/११/२०१२ रोजी निवाडा घोषित झाल्यानंतर भुसंपादन अधिकारी यांनी जागामालकांकडुन जमिनीचे ताबा घेतलेला आहे. मात्र आजतागायत जळगांव शहर महानगरपालिकेस जमिनीचा ताबा प्राप्त झालेला नाही तसेच सदरच्या जमिनी ह्या प्रत्यक्षात सुध्दा जळगांव शहर महानगरपालिकेच्या ताब्यात नाहीत. त्याच प्रमाणे सदर जमिनी मागील १२ वर्षाच्या कालावधीत कोणत्याही सार्वजनिक उपयोगासाठी वापरण्यात आलेल्या नाहीत व यापुढेही आवश्यकता नाही. तसेच मालमत्ता पत्रकावर सुध्दा सदर जमिनी आजमितीस महापालिकेच्या नावावर नाहीत.

वरील प्रमाणे सर्व स्थिती पहाता सदर जमिनीचे भुसंपादन रद्द करणे आवश्यक असल्याने या बाबत शासनाकडे भुसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पुर्नस्थापना, आणि पुर्नवसन अधिनियम २०१३ मधील तरतुदी नुसार भुसंपादन रद्द करुन जमिनींची मालकी मुळ मालकास परत करण्यात यावी या प्रमाणे प्रस्ताव शासनास सादर करणे आवश्यक आहे.

त्याच प्रमाणे वरील प्रमाणे भुसंपादन रद्द करणे करीता शासनाकडे प्रस्ताव सादर केल्यास, तदनंतरही मंजुर विकास योजना (जु.ह) नुसार जमिनीवरील आरक्षणाची स्थिती (आ.क्र.०१ :- हायस्कुल व क्रिडांगणाकरीता) ही कायम राहते व भविष्यात, शासनाने, भुसंपादन प्रस्ताव रद्द करण्यास मान्यता दिल्यास व सदर आरक्षित जमिनींची मालकी मुळ मालकास परत केल्यास आरक्षणांमुळे मुळ मालकास जमिन वापरता येणार नाही. यामुळे

जमिन मालक पुन्हा मे.न्यायालयात दाद मागु शकतात भविष्यात कायदेशीर गुंतागुंत वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये सदर जमिनी आरक्षण मुक्त करणे क्रमप्राप्त असल्याने त्या प्रमाणे प्रस्ताव शासनास सादर करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे मे.जिल्हा न्यायालयाने निर्णयाचे अनुषंगाने रक्कम रुपये- ३१,२२,२४,३२२/- मोबदला अवाजवी असल्याने व त्यावरील व्याज आकारणीसुध्दा सुरु झालेली असल्याने मे.जिल्हा न्यायालयाचे निर्णयाचे विरोधात त्वरीत मे.उच्च न्यायालयात अपील दाखल करणे आवश्यक असल्याने सदरच्या प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशीर अडचणी येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४०** **(महासभा)**

**विषय क्र.:-** ०६ **प्रशासक ठराव क्र.:-** २९९ **दिनांक :-११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, सार्व.स्वच्छता विभाग यांचेकडिल जा.क्र./सार्व.स्वच्छता वि./३५२/२०२५-२६ दि.०९/०७/२०२५
३. सहाय्यक आयुक्त, सार्व.स्वच्छता विभाग यांचा दि.०४/०७/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.०७/०७/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.२६/०६/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.०९/०७/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत, स्वच्छ सर्वेक्षण, कचरा मुक्त शहर, हागणदारी मुक्त शहर घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६, NGT इ.कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणे तसेच विविध स्पर्धांमध्ये चांगले गुणांकन मिळविणेच्या अनुषंगाने शासनाच्या पॅनलवरील एमपॅनल एजन्सी All India Institute Of Local Self Government यांची विनानिविदा नियुक्ती करणेबाबत.

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, सार्व.स्वच्छता विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत, स्वच्छ सर्वेक्षण, कचरा मुक्त शहर, हागणदारी मुक्त शहर घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६, NGT आणि MPCB/CPCB कडील आदेश, सिंगल युज प्लास्टिक निर्मुलन तसेच माझी वसुंधरा अभियान इ. कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणे तसेच विविध स्पर्धांमध्ये चांगले गुणांकन मिळविणेच्या अनुषंगाने शासनाच्या पॅनल वरील अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, यांना Swacchh Bharat Mission Knowledge Partner म्हणून केंद्र शासनाने Impaneled Egency म्हणुन घोषित केले आहे. सदर संस्थेने महाराष्ट्र राज्यातील विविध महानगरपालिकांमध्ये स्वच्छ भारत अभियान अंतर्गत विविध कार्यक्रमांच्या तसेच घनकचरा व्यवस्थापनाचे तांत्रिक सल्लागार म्हणून कामकाज केले आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेकडून स्वच्छ भारत अभियान अंतर्गत, स्वच्छ सर्वेक्षण, कचरा मुक्त शहर, हागणदारी मुक्त शहर घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६, NGT आणि MPCB/CPCB कडील आदेश, सिंगल युज प्लास्टिक निर्मुलन तसेच माझी वसुंधरा अभियान इ. कार्यक्रमांची अंमलबजावणी केली जाते, तसेच शासनाच्या विविध स्पर्धांमध्ये जळगांव शहर महानगरपालिका सहभागी आहे. शहरास मिळणारा निधी तसेच शहराचे नावलौकीक वाढविण्यासाठी या स्पर्धांमध्ये चांगले गुणांकन मिळविणे आवश्यक आहे. सदरच्या कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करीता सल्लागार संस्थेची आवश्यकता आहे. या संस्थेकडून पुढीलप्रमाणे कामकाज केले जाणार आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप (Scope of Work) |
|---|---|
| १. | स्वच्छ सर्वेक्षण, कचरा मुक्त शहर, हागणदारी मुक्त शहर, Water+ घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६, NGT आणि MPCB/CPCB कडील आदेश, सिंगल युज प्लास्टिक निर्मुलन तसेच माझी वसुंधरा अभियान इ. कार्यक्रमांची क्षेत्रीय स्तरावर प्रभावी अंमलबजावणी करणेच्या अनुषंगाने कृती आराखडा तयार करणे व त्याबाबत सल्लागार म्हणून कामकाज करणे. |
| २. | स्वच्छ सर्वेक्षण, कचरा मुक्त शहर, हागणदारी मुक्त शहर, Water+ घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६, NGT आणि MPCB/CPCB कडील आदेश, सिंगल युज प्लास्टिक निर्मुलन तसेच माझी वसुंधरा अभियान इ. कार्यक्रमांची दैनंदीन/मासिक माहिती MIS संबंधित संकेत स्थळावर विहीत वेळेत अपलोड करणे. |

| | |
|---|---|
| ३. | स्वच्छ सर्वेक्षण, कचरा मुक्त शहर, हागणदारी मुक्त शहर, Water+ घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६, NGT आणि MPCB/CPCB कडील आदेश, सिंगल युज प्लास्टिक निर्मुलन तसेच माझी वसुंधरा अभियान इ. कार्यक्रमांचे दस्तएवजीकरण करणे व ते शासनाच्या समितीस वेळोवेळी सादर करणे. |
| ४. | क्षेत्रीय स्तरावरील करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे/ उपक्रमांचे छायाचित्रीकरण करणे, संकलन करणे व सोशल मिडीयांच्या माध्यमांमध्ये प्रसारीत करणे. |
| ५. | सदर कामकाजासाठी पूर्णवेळ २ प्रशिक्षित समन्वयक जशमनपा मध्ये कार्यरत ठेवणे तसेच एक समन्वयक क्षेत्रीय स्तरावरील कामासाठी आवश्यकतेनूसार कार्यरत राहील. |
| ६. | Swachhata App चे Monitoring करणे तसेच या ॲपव्दारे प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निवारण करणे. |

उपरोक्त कामकाजांसाठी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था नाशिक यांचेकडील दि.११/०६/२०२५ रोजीच्या प्रस्तावानूसार दरमहा २,००,०००/- (दोन लक्ष) इतकी सल्लागार फी आकारली जाईल, नमूद कामे घनकचरा व्यवस्थापनाशी निगडीत असल्याने सदरच्या फी चा खर्च १५ वा वित्त आयोग तसेच स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून उपलब्धतेनूसार भागविता येईल.

करीता उपरोक्त नमूद कामकाजांसाठी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था नाशिक यांना सल्लागार संस्था म्हणून विना निविदा नियुक्त करणेस मान्यता मिळणेसाठी सहाय्यक आयुक्त, सार्व.स्वच्छता विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशीर अडचणी येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४०** **(महासभा)**

**विषय क्र.:-** ०७ **प्रशासक ठराव क्र.:-** ३०० **दिनांक :-११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, सार्व.स्वच्छता विभाग यांचेकडिल जा.क्र./सार्व.स्वच्छता वि./३५१/२०२५-२६ दि.०९/०७/२०२५
३. सहाय्यक आयुक्त, सार्व.स्वच्छता विभाग यांचा दि.२७/०६/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.३०/०६/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.३०/०६/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.०४/०७/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** शहरातील शौचालयांचे सेप्टीक टँक खाली करणेकामी अतिरिक्त व्हॅक्युम एम्प्टीयर वाहन लावणे कामी मे.कॅम फाऊडेशन हिंजेवाडी पुणे यांना परवानगी देणेबाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, सार्व.स्वच्छता विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

शहरातील शौचालयांचे सेप्टीक टँक खाली करणेकामी मनपाचे वाहन कालबाह्य झाली असल्याने सदर वाहनास भंगार लिलावामध्ये समाविष्ट करण्यात आली असल्याने नागरीकांना शौचालयांचे सेप्टीक टँक रिकामे करण्यासाठी प्रतिक्षा करावी लागत आहे. मे.कॅम फाऊडेशन, हिंजेवाडी पुणे यांना प्रशासक ठराव क्रं.३१ दि.१४/१२/२०२३ चे ठरावाचे मान्यतेने जळगांव शहर महानगरपालिकेकडे एक व्हॅक्युम एम्प्टीयर वाहन लावण्याचे जा.क्रं./जशमनपा/आ.वि./८८४/२०२३-२४ दि.०७/०२/२०२४ नूसार कार्यादेश देण्यात आलेला आहे.

स्वच्छ भारत अभियान आणि CPHEEO चे मार्गदर्शक तत्वांप्रमाणे शौचालयाचे सेप्टीक टँक दर ३ वर्षांनी रिकामे करणे आवश्यक आहे. त्यानुसार शहरातील सेप्टीक टँकची संख्या १,२०,००० यानूसार किमान ४ वाहनांची आवश्यकता आहे. सदयस्थितीत मे.कॅम फाऊडेशन पुणे, यांचेकडील एकच वाहन कार्यरत आहे. त्यामुळे नागरीकांना अनेक दिवस प्रतिक्षा करावी लागत आहे. तथापि सेप्टीक टँक वेळेत रिकामे करणे नागरीकांच्या आरोग्य हितकारक आहे. करीता मे.कॅम फाऊडेशन पुणे यांना कार्यादेशानूसार यापुर्वीच्या मंजूर दरातच आणखी अतिरीक्त वाहने जळगांव शहर महानगरपालिकेकडे लावण्यास परवानगी मागितलेली आहे.

सदर सेप्टीक टँक रिकामे करण्यासाठी आरोग्य विभाग येथे रु.८००/- प्रती ट्रीप प्रमाणे फी आकारणी केली जाते सदर जमा होणाऱ्या रक्कमेतून मे.कॅम फाऊडेशन यांच्या वाहनाव्दारे केलेल्या कामाचे मासिक देयक अदा केले जाईल.

करीता स्वच्छ भारत अभियान CPHEEO चे मार्गदर्शक तत्वांप्रमाणे शहरातील सेप्टीक टँक रिकामे करण्याची वारंवारता आणि नागरीकांची मागणी विचारात घेता अतिरिक्त वाहने लावण्याची मे.कॅम फाऊडेशन हिंजेवाडी पुणे यांना परवानगी देणेस मान्यता मिळणेसाठी सहाय्यक आयुक्त, सार्व.स्वच्छता विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशीर अडचणी येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260



**सभा क्र.४०** **(महासभा)**

**विषय क्र.:-** ०८ **प्रशासक ठराव क्र.:-** ३०१ **दिनांक :-११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. परिवहन विभाग प्रमुख यांचेकडिल जा.क्र.परिवहन/०४/२०२५ दि.१०/०७/२०२५
३. परिवहन विभाग प्रमुख यांचा दि.२७/०६/२०२५ चा अभिप्राय
४. शहर अभियंता यांचा दि.२७/०६/२०२५ चा अभिप्राय
५. सहाय्यक आयुक्त, परिवहन विभाग यांचा दि.०१/०७/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.१०/०७/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** पीएम ई-बस सेवा परिवहन उपक्रमाच्या अंतर्गत जळगांव शहर व लगत असलेल्या गावांकरीता ई-बस सेवेचा मार्गावर बस थांबे निश्चितीबाबत.

---

वाचा क्र.१ व परिवहन विभाग प्रमुख यांचा वाचा क्रं. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

केंद्र शासनामार्फत पर्यावरण पुरक शाश्वत वाहतुकीस प्रोत्साहन देणेकामी पीएम ई-बस सेवा योजना दिनांक १६ ऑगस्ट २०२३ रोजी मंजूर करण्यात आलेली आहे. सदर योजने अंर्तगत जळगाव शहर परिवहन वाहतुकीकरीता एकूण ५० नग ई-बसेस उपलब्ध करून देण्यात येणार असुन प्रस्तावीत बस डेपोच्या प्रत्यक्ष कामास सुरूवात करण्यात आलेली आहे. सदर योजने अंर्तगत जळगाव शहर व लगत असलेल्या गावांकरीता परिवहन सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर परिवहन उपक्रमाच्या अंर्तगत जळगाव शहर व लगत असलेल्या गावांमध्ये ई-बस सेवेचा मार्ग परिक्रमीत करण्याबाबत प्रस्तावीत आहे. तरी सदर मार्ग परिक्रमण स्थानिक नागरिकांच्या तसेच शहरामधील प्रमुख संस्थांच्या दृष्टीनेदेखील सोईचे असण्याकरीता महानगरपालिकेमार्फत जाहिर सुचना क्र. परिवहन/ २९, दिनांक २७/०१/२०२५ नुसार स्थानिक वृत्तपत्रांमधून सुचना व हरकती मागविण्यात आलेल्या आहेत. सदर जाहिर सुचनेच्या अनुषंगाने महानगरपालिकेकडेस एकूण ७५ सुचना व हरकती प्राप्त असुन त्याचे अवलोकन होऊन पुढील मार्ग निश्चीतीच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधी मा.श्रीमती स्मिताताई वाघ, लोकसभा सदस्य, जळगाव लोकसभा मतदार संघ व मा.श्री.सुरेश दामू भोळे (राजूमामा), विधानसभा सदस्य, जळगाव शहर यांच्या अध्यक्षतेखाली यांच्या समवेत दिनांक ०८/०५/२०२५ रोजी बैठक आयोजीत करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार महासभा ठराव क्र. २८२, दिनांक २७/०५/२०२५ नुसार एकूण २३ मार्ग निश्चित करण्यात आलेले आहेत. दिनांक ०८/०८/२०२५ रोजी सन्मा. सदस्यांसमवेत झालेल्या चर्चेनुसार सदर मार्गांवर खालीलप्रमाणे बस थांबे निश्चित करणे प्रस्तावीत आहे.

| मार्ग क्र. | मार्गाचा तपशील | प्रस्तावीत थांबे | एकूण थांबे |
|---|---|---|---|
| १ | जळगाव शहर जुने बस स्टॅण्ड ते स्वातंत्र चौक ते आकाशवाणी चौक ते महामार्गे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र **विद्यापीठ** | १) जुने बस स्थानक, २) शास्त्री टॉवर, ३) नेहरू चौक, ४) गोविंदा स्टॉप, ५) कोर्ट चौक, ६) एस बी आय, ७) नवीन बस स्टॅण्ड, ८) स्वातंत्र चौक, इंडिया गॅरेज, ९) आकाशवाणी चौक, १०) बहिणाबाई उद्यान, ११) अग्रवाल हॉस्पीटल, १२) गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, १३) विद्युत कॉलनी, १४) शिवकॉलनी, १५) मानराज पार्क, १६) गुजराल पेट्रोल पंप, १७) खोटे नगर, १८) व्दारकानगर, वाटीकाश्रम, १९) आहुजा नगर, २०) वर्धमान शाळा, जैन फुड, २१) एस. एस.बी.टी. २२) जैन इरिगेशन, २३) विद्यापीठ, २४) विद्यापीठ बिल्डींग | २४ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | जळगाव शहर जुने बस स्टॅण्ड ते स्वातंत्र चौक ते आकाशवाणी चौक ते महामार्गे पाळधी | १) जुने बस स्थानक, २) शास्त्री टॉवर, ३) नेहरू चौक, ४) गोविंदा स्टॉप, ५) कोर्ट चौक, ६) एस बी आय, ७) नवीन बस स्टॅण्ड, ८) स्वातंत्र चौक, इंडिया गॅरेज, ९) आकाशवाणी चौक, १०) बहिणाबाई उद्यान, ११) अग्रवाल हॉस्पीटल, १२) गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, १३) विद्युत कॉलनी, १४) शिवकॉलनी, १५) मानराज पार्क, १६) गुजराल पेट्रोल पंप, १७) खोटे नगर, १८) व्दारकानगर, वाटीकाश्रम, १९) आहुजा नगर, २०) वर्धमान शाळा, जैन फुड, २१) एस. एस.बी.टी. २२) जैन इरिगेशन, २३) विद्यापीठ, २४) जळगाव बायपास, २५) पाळधी | २५ |
| ३ | जळगाव शहर जुने बस स्टॅण्ड ते नेरी नाका ते अंजिठा चौफुली ते महामार्गे डॉ. उल्हास पाटील मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल, जळगाव खुर्द | १) जुने बस स्थानक, २) कोंबडी बाजार चौक, ३) पुष्पलता बेंडाळे चौक, ४) नेरी नाका, ५) एस टी वर्कशॉप, ६) अजिंठा चौफुली, ७) ऑटो नगर, ८) कालीका माता मंदिर, ९) आयोध्या नगर, १०) खेडी, ११) डॉ. उल्हास पाटील इंजिनियरिंग कॉलेज, १२) स्वामी नारायण मंदिर, १३) मन्यारखेडा, १४) तरसोद फाटा, १५) नशिराबाद, १६) सिमेंट फॅक्टरी, १७) डॉ. उल्हास पाटील मेडीकल कॉलेज | १७ |
| ४ | जळगाव शहर जुने बस स्टॅण्ड ते स्वातंत्र चौक ते आकाशवाणी चौक ते इच्छादेवी चौक ते शिरसोली मार्गे वावडदा ते म्हसावद | १) जुने बस स्थानक, २) शास्त्री टॉवर, ३) नेहरू चौक, ४) गोविंदा स्टॉप, ५) कोर्ट चौक, ६) एस बी आय, ७) नवीन बस स्टॅण्ड, ८) स्वातंत्र चौक, इंडिया गॅरेज, ९) आकाशवाणी चौक, १०) ईच्छादेवी, ११) डी - मार्ट, १२) मोहाडी फाटा, १३) मेहरूण तलाव, १४) सेंट लॉरेन्स शाळा, १५) रायसोनी कॉलेज, देवकर कॉलेज, १६) गांधी तीर्थ, १७) जैन इरिगेशन, १८) ओम साई बी.एड कॉलेज, १९) शिरसोली प्र.बो., २०) शिरसोली प्र.न., २१) वावडदा तांडा, २२) जामनेर फाटा, २३) पाचोरा फाटा,वावडदा गाव, २४) म्हसावद रेल्वे स्टेशन, २५) म्हसावद | २५ |
| ५ | जळगाव शहर जुने बस स्टॅण्ड ते नेरी नाका ते अजिंठा चौफुली ते कुसुंबा मार्गे उमाळा फाटा | १) जुने बस स्थानक, २) कोंबडी बाजार चौक, ३) पुष्पलता बेंडाळे चौक, ४) नेरी नाका, ५) एस टी वर्कशॉप, ६) अजिंठा चौफुली, ७) बाजार समिती, ८) हॉटेल काशीनाथ, ९) हॉटेल कस्तुरी, मेहरूण गाव, १०) रेमंड चौफुली, ११) आर. एल. चौफुली, १२) सुप्रीम कॉलनी, १३) जळगाव तोलकाटा, १४) कुसुंबा, १५) गोशाळा, १६) एअरपोर्ट, १७) चिंचोली, १८) मेडीकल कॉलेज, १९) उमाळे | १९ |
| ६ | जळगाव शहर जुने बस स्टॅण्ड ते शिवाजी नगर मार्गे कानळदा | १) नवीन बस स्थानक, २) शास्त्री टॉवर, ३) कानळदा बस स्टॉप शिवाजी नगर, ४) लाकूडपेठ, ५) गेंदालाल मिल, ६) रिंगरोड टी पॉईंट, ७) के सी पार्क, ८) महादेव नगर, ९) जळगाव बायपास, १०) आव्हाणे फाटा, ११) खेडी फाटा, १२) वडनगरी फाटा, १३) फुपनगरी फाटा, १४) कानळदा | १४ |
| ७ | जळगाव शहर जुने बस स्टॅण्ड ते ममुराबाद मार्गे विदगाव | १) नवीन बस स्थानक, २) शास्त्री टॉवर, ३) कानळदा बस स्टॉप शिवाजी नगर, ४) लाकूडपेठ, ५) क्रांती चौक, ६) डी. बी. जैन हॉस्पीटल, ७) अमर चौक, ८) कान्हाकाई रोड, ९) ममुराबाद पुल, १०) उस्मानिया पार्क, ११) जळगाव बायपास, १२) कृषी विज्ञान केंद्र, १३) ममुराबाद, १४) फार्मसी कॉलेज, १५) तुरखेडा फाटा, धामणगाव फाटा, १६) विदगाव | १६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | जळगाव शहर जुने बस स्टॅण्ड ते असोदा, भादली ते शेळगाव | १) नवीन बस स्थानक, २) शास्त्री टॉवर, ३) सानेगुरूजी चौक, ४) घाणेकर चौक, ५) शनिपेठ पोलीस चौकी, ६) दधिची चौक, ७) घरकुल, ८) गोल बंगला, ९) जळगाव बायपास, १०) हनुमान मंदिर, ११) असोदा, १२) बहिणाबाई स्मारक, १३) भादली, १४) कडगाव फाटा, १५) शेळगाव | १५ |
| ९ | जळगाव शहर जुने बस स्टॅण्ड ते स्वातंत्र चौक ते आकाशवाणी चौक ते काव्यरत्नावली चौक मार्गे हरिविठ्ठल नगर | १) जुने बस स्थानक, २) शास्त्री टॉवर, ३) नेहरू चौक, ४) गोविंदा स्टॉप, ५) कोर्ट चौक, ६) एस बी आय, ७) नवीन बस स्टॅण्ड, ८) स्वातंत्र चौक, इंडिया गॅरेज, ९) आकाशवाणी चौक, १०) काव्यरत्नावली चौक, ११) अजिंठा रेस्ट हाऊस, १२) भगिरथ शाळा, १३) गिरणा टाकी, १४) रामानंद नगर, १५) कपाट कारखाना, १६) गिरणा पंपींग रोड, १७) हरिविठ्ठल नगर | १७ |
| १० | जळगाव शहर जुने बस स्टॅण्ड ते स्वातंत्र चौक ते आकाशवाणी चौक ते इच्छादेवी चौक ते शिरसोली नाका ते रायसोनी नगर मार्गे मोहाडी | १) जुने बस स्थानक, २) शास्त्री टॉवर, ३) नेहरू चौक, ४) गोविंदा स्टॉप, ५) कोर्ट चौक, ६) एस बी आय, ७) नवीन बस स्टॅण्ड, ८) स्वातंत्र चौक, इंडिया गॅरेज, ९) आकाशवाणी चौक, १०) ईच्छादेवी, ११) डी - मार्ट, १२) शिरसोली फाटा, १३) नेहरू नगर, १४) बाबा पेट्रोल पंप, १५) लांडोरखोरी उद्यान, १६) रायसोनी नगर, १७) देवेंद्र नगर, १८) शासकीय रुग्णालय, १९) मोहाडी | १९ |
| ११ | जळगाव शहर जुने बस स्टॅण्ड ते कोर्ट चौक ते रिंगरोड ते रेल्वे उड्डाण पुल ते पिंप्राळा मार्गे हुडको | १) जुने बस स्थानक, २) शास्त्री टॉवर, ३) नेहरू चौक, ४) गोविंदा स्टॉप, ५) कोर्ट चौक, ६) नुतन मराठा, ७) अभिनव शाळा, ८) शाहु नगर, ९) गोकूळ स्वीट मार्ट, रिंगरोड, १०) दत्त कॉलनी, ११) फॉरेस्ट कॉलनी, १२) शिवाजी नगर फाटा, १३) यश लॉन, भोईटे नगर, १४) गुड्डूराजा नगर, १५) बजरंग बोगदा, १६) रायसोनी शाळा, १७) भवानी माता मंदिर, १८) तलाठी ऑफिस, १९) छत्रपती शिवाजी महाराज चौक, २०) निसर्ग कॉलनी, २१) विठ्ठल मंदिर, २२) खंडेराव नगर फाटा, चिच, २३) नवीन हुडको, २४) हुडको | २४ |
| १२ | जळगाव शहर जुने बस स्टॅण्ड ते स्वातंत्र चौक ते आकाशवाणी चौक ते काव्यरत्नावली चौक ते संत गाडगेबाबा चौक ते कोल्हे हिल्स | १) जुने बस स्थानक, २) शास्त्री टॉवर, ३) नेहरू चौक, ४) गोविंदा स्टॉप, ५) कोर्ट चौक, ६) एस बी आय, ७) नवीन बस स्टॅण्ड, ८) स्वातंत्र चौक, इंडिया गॅरेज, ९) आकाशवाणी चौक, १०) काव्यरत्नावली चौक, ११) छत्रपती संभाजी महाराज नाट्यगृह, रामानंद नगर पोलीस चौकी, १२) रोटरी हॉल, १३) जाणता राजा चौक, १४) लाईफस्टाईल, १५) संभाजी नगर, १६) संत गाडगेबाबा चौक, १७) समता नगर, १८) कोल्हे हिल्स | १८ |
| १३ | एकनाथ नगर, मेहरूण ते नमस्कार मॉल ते इच्छादेवी चौक ते आकाशवाणी चौक ते स्वातंत्र चौक मार्गे रेल्वे स्टेशन | १) आदिती हॉटेल, २) स्वामी समर्थ चौक, ३) नमस्कार मॉल, ४) गावहाळ, ५) महादेव मंदिर, गोपीनाथ मुंडे चौक, ६) बिलाल चौक, ७) इच्छादेवी, ८) आकाशवाणी, ९) स्वातंत्र चौक, इंडिया गॅरेज, १०) नवीन बस स्टॅण्ड, ११) एस बी आय, १२) कोर्ट चौक, १३) गोविंदा स्टॉप, १४) नेहरू चौक, १५) शास्त्री टॉवर, १६) जुने बस स्टॅण्ड | १६ |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | जळगाव शहर जुने बस स्टॅण्ड ते शिवाजी नगर पुलामार्गे निमखेडी गाव | १) नवीन बस स्थानक, २) शास्त्री टॉवर, ३) कानळदा बस स्टॉप शिवाजी नगर, ४) गेंदालाल मिल, ५) खडके चाळ, ६) एस के ऑईल मिल, ७) फेडरेशन, ८) सुरत रेल्वे गेट, ९) कांताई नेत्रालय, १०) हायवे दर्शन, ११) देवराम नगर, १२) श्रीराम नगर बालाजी अपार्टमेंट, १३) विठ्ठलवाडी डिलाईट अपार्टमेंट, १४) चंदु आण्णा नगर स्टॉप, १५) शिवधाम, १६) गजानन कॉलनी, १७) पटेल पाईप, १८) निमखेडी | १८ |
| १५ | जळगाव शहर जुने बस स्टॅण्ड ते कोर्ट चौक ते रिंगरोड ते गणेश कॉलनी | १) जुने बस स्थानक, २) शास्त्री टॉवर, ३) नेहरू चौक, ४) गोविंदा स्टॉप, ५) कोर्ट चौक, ६) नुतन मराठा, ७) अभिनव शाळा, ८) शाहु नगर, ९) गोकूळ स्वीट मार्ट, रिंगरोड, १०) बाबासाहेब आंबेडकर उद्यान ११) ख्वाजामिया, १२) गणेश कॉलनी | १२ |
| १६ | शिरसोली नाका ते इच्छादेवी चौक ते पांडे डेअरी ते पुष्पलता बेंडाळे चौक मार्गे जुने बस स्टॅण्ड | १) डी - मार्ट, २) ईच्छादेवी, ३) सिंधी कॉलनी, ४) भंगाळे हॉस्पीटल, ५) पंचमुखी हनुमान, ६) पांडे डेअरी, ७) सिव्हील हॉस्पीटल, ८) पुष्पलता बेंडाळे चौक, ९) कोंबडी बाजार चौक, १०) जुने बस स्थानक | १० |
| १७ | जळगाव शहर जुने बस स्टॅण्ड ते स्वातंत्र चौक ते आकाशवाणी चौक ते इच्छादेवी चौक ते शिरसोली | १) जुने बस स्थानक, २) शास्त्री टॉवर, ३) नेहरू चौक, ४) गोविंदा स्टॉप, ५) कोर्ट चौक, ६) एस बी आय, ७) नवीन बस स्टॅण्ड, ८) स्वातंत्र चौक, इंडिया गॅरेज, ९) आकाशवाणी चौक, १०) ईच्छादेवी, ११) डी - मार्ट, १२) मोहाडी फाटा, १३) मेहरूण तलाव, १४) सेंट लॉरेन्स शाळा, १५) रायसोनी कॉलेज, देवकर कॉलेज, १६) गांधी तीर्थ, १७) जैन इरिगेशन, १८) ओम साई बी.एड कॉलेज, १९) शिरसोली प्र.बो., २०) शिरसोली प्र.न | २० |
| १८ | जळगाव शहर जुने बस स्टॅण्ड ते नेरी नाका ते अजिंठा चौफुली ते कुसुंबा ते चिंचोली गाव ते धानवड | १) जुने बस स्थानक, २) कोंबडी बाजार चौक, ३) पुष्पलता बेंडाळे चौक, ४) नेरी नाका, ५) एस टी वर्कशॉप, ६) अजिंठा चौफुली, ७) बाजार समिती, ८) हॉटेल काशीनाथ, ९) हॉटेल कस्तुरी, मेहरूण गाव, १०) रेमंड चौफुली, ११) आर. एल. चौफुली, १२) सुप्रीम कॉलनी, १३) जळगाव तोलकाटा, १४) कुसुंबा, १५) गोशाळा, १६) एअरपोर्ट, १७) चिंचोली, १८) धानवड | १८ |
| १९ | एकनाथ नगर, मेहरूण अशोक किराणा ते अजिंठा चौफुली ते नेरी नाका ते जुने बस स्टॅण्ड | १) आदिती हॉटेल, २) स्वामी समर्थ चौक, ३) अशोक किराणा, ४) संतोषी माता चौक, ५) हॉटेल काशीनाथ, ६) बाजार समिती, ७) अजिंठा चौफुली, ८) एस टी वर्कशॉप, ९) नेरी नाका, १०) पुष्पलता बेंडाळे चौक, ११) कोंबडी बाजार चौक, १२) जुने बस स्थानक | १२ |
| २० | मेहरूण ते हॉटेल कस्तुरी ते कुसुंबा ते चिंचोली गाव | १) महादेव मंदिर, गोपीनाथ मुंडे चौक, २) गावहाळ, ३) नमस्कार मॉल ४) अशोक किराणा, ५) हॉटेल कस्तुरी, ६) रेमंड चौफुली, ७) आर. एल. चौफुली, ८) सुप्रीम कॉलनी, ९) जळगाव तोलकाटा, १०) कुसुंबा, ११) गोशाळा, १२) एअरपोर्ट, १३) चिंचोली | १३ |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | जळगाव एम. आय. डी. सी. परिसर - अजिंठा चौक ते जळगाव तोल काटा ते एफ सी आय गोडाऊन ते भारत पेट्रोलियम ते विनुज वर्ल्ड ते गोदावरी कॉलेज ते महामार्गे अजिंठा चौक | १) अजिंठा चौफुली, २) बाजार समिती, ३) हॉटेल काशीनाथ, ४) हॉटेल कस्तुरी, मेहरूण गाव, ५) रेमंड चौफुली, ६) आर. एल. चौफुली, ७) सुप्रीम कॉलनी, ८) जळगाव तोलकाटा, ९) एफ सी आय गोडाऊन, १०) पद्मसिद्धी ऑटो, ११) तुलसी एक्सट्रूजन, १२) एमको, १३) भारतगॅस, १४) एम आय डी सी पार्किंग, १५) विनूज, १६) डॉ. उल्हास पाटील इंजिनियरिंग कॉलेज १७) खेडी, १८) आयोध्या नगर, १९) कालीका माता मंदिर, २०) ऑटो नगर | २० |
| २२ | जळगाव शहर जुने बस स्टॅण्ड ते कोर्ट चौक ते रिंगरोड ते रेल्वे उड्डाण पुल ते पिंप्राळा मार्गे सावखेडे | १) जुने बस स्थानक, २) शास्त्री टॉवर, ३) नेहरू चौक, ४) गोविंदा स्टॉप, ५) कोर्ट चौक, ६) नुतन मराठा, ७) अभिनव शाळा, ८) शाहु नगर, ९) गोकूळ स्वीट मार्ट, रिंगरोड, १०) दत्त कॉलनी, ११) फॉरेस्ट कॉलनी, १२) शिवाजी नगर फाटा, १३) यश लॉन, भोईटे नगर, १४) गुड्डूराजा नगर, १५) बजरंग बोगदा, १६) रायसोनी शाळा, १७) भवानी माता मंदिर, १८) तलाठी ऑफिस, १९) छत्रपती शिवाजी महाराज चौक, २०) निसर्ग कॉलनी, २१) विठ्ठल मंदिर, २२) खंडेराव नगर फाटा, चिच, २३) सावखेडे | २३ |
| २३ | जळगाव शहर जुने बस स्टॅण्ड ते स्वातंत्र चौक ते आकावशाणी चौक ते विद्युत कॉलनी ते शिवकॉलनी मार्गे, आशाबाबा नगर ते खंडेराव नगर पुल | १) जुने बस स्थानक, २) शास्त्री टॉवर, ३) नेहरू चौक, ४) गोविंदा स्टॉप, ५) कोर्ट चौक, ६) एस बी आय, ७) नवीन बस स्टॅण्ड, ८) स्वातंत्र चौक, इंडिया गॅरेज, ९) आकाशवाणी चौक, १०) बहिणाबाई उद्यान, ११) अग्रवाल हॉस्पीटल, १२) गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, १३) विद्युत कॉलनी, १४) देशमुख प्लाझा, १५) मारोती पार्क, १६) आशाबाबा नगर, १७) खंडेराव नगर पुल | १७ |

तसेच उपरोक्त मार्गांवर नागरिकांच्या सोयीनुसार व वाहतुकीस अडथळा होणार नाही अश्या पध्दतीने बस थांबे घेणेबाबत सदर बैठकीत सन्मा. सदस्य यांच्यामार्फत सुचना करण्यात आलेल्या आहेत. उपरोक्त बस थांबे खासगी विकासकांमार्फत स्वखर्चाने विकसीत करावयाचे झाल्यास विहीत पद्धतीने विकसनाकरीता स्थानिक व्यवसायीकांकरीता देणेस हरकत नाही. तरी उपरोक्त मार्गांवर प्रस्तावीत बस थांबे निश्चित करणेस मान्यता मिळणेसाठी परिवहन विभाग प्रमुख यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशीर अडचणी येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४०** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०९** **प्रशासक ठराव क्र.:- ३०२** **दिनांक :-११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचेकडिल जा.क्र./४५/२०२५ दि.१०/०७/२०२५

३. अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचा दि.१६/०६/२०२५ चा अभिप्राय

४. उपायुक्त यांचा दि.२७/०६/२०२५ चा अभिप्राय

५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि. ०२/०७/२०२५ चा अभिप्राय

६. आयुक्त यांचा दि. ०८/०७/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** महिला व बालकल्याणाच्या कार्यक्रमासाठी शासन निर्णयाप्रमाणे जळगांव महानगरपालिकेमध्ये १ ते २४ योजना / उपक्रमांचा आराखडा राबविणे संदर्भात प्रस्ताव.

---

वाचा क्र.१ व अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

शासन निर्णय क्र.जी.ई.एन-१०९३/१९९२/नवि-१४ दि.३०/०६/१९९२ नुसार महिला व बालकल्याणाच्या कार्यक्रमासाठी महानगरपालिका / नगरपालिकेने त्यांच्या अर्थसंकल्पात तरतुद केलेल्या वार्षिक महसूली उत्पनातील बांधील खर्च वजा जाता उर्वरित रक्कमेच्या ५% निधी राखुन ठेवावा असे निर्देश करण्यात आलेले होते व तसेच शासन निर्णय क्र.एम.यु.एम./२०२१/प्र.क्र.३८५/नवि-१७ दि.२९ मार्च २०२२ नुसार आवश्यक बाबींवर खर्च करणे (`अ` नुसार अंतर्भुत असलेली) महिला व बालकल्याणासाठी महानगरपालिकेच्या वार्षिक एकुण उत्पन्नापैकी बांधील खर्च वजा जाता राहिलेल्या निव्वळ महसूलातील ५% रक्कमेमधुन राबवावयाच्या महिला व बालकल्याणासाठीच्या असलेल्या योजना / कार्यक्रम / कामे राबविणेस शासनाने मान्यता दिलेली आहे.

यापूर्वी मा. महासभा ठराव क्र.६९२ दिनांक १५/१२/२०२२ अन्वये महानगरपालिकेमार्फत महिला व बालकल्याणामार्फत १ ते १५ उपक्रम / योजना राबविण्यात येत होते, परंतु उक्त नमुद शासन निर्णयातील निर्देशानुसार तसेच सुचनेनुसार महिला व बालकल्याणाच्या संबंधित उपक्रम / योजनेत सुधारणा करणे तसेच अतिरिक्त योजना / उपक्रमांचा समावेश करून त्यानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक होते, त्यानुसार उक्त शासन निर्णयातील निर्देशांचा व सुचनांचा अभ्यासपूर्ण विचार करून सन २०२३-२४ करिता अनुक्रम १ ते २३ योजना / उपक्रमांचा आराखडा तयार करण्यात आलेला होता, सदर योजनांचा / उपक्रमांचा आराखडा मान्यतेसाठी व त्यानुसार योजना / उपक्रम राबविणे कामी मा. महासभा ठराव क्र.११७२ दिनांक ०७/०७/२०२३ अन्वये सदर ठरावात नमुद केलेल्या १ ते २३ योजनांचा / उपक्रमांचा आराखडा राबविण्यास मंजुरी प्रदान करण्यात आली.

त्या अनुषंगाने सन २०२४-२५ या मागील आर्थिक वर्षाकरिता देखील महिला व बालकल्यणाकरिता असलेल्या योजना / कार्यक्रम राबविणेसाठी व शासन निर्णय क्र.एम.यु.एम./२०१०/प्र.क्र.३८५/नवि-१७ दि.२९ मार्च २०२२ नुसार आवश्यक बाबींवर खर्च करणे (`अ` नुसार अंतर्भुत असलेली) तसेच मा. महासभा ठराव क्र.११७२ दिनांक ०७/०७/२०२३ मध्ये नमुद केलेल्या अनुक्रमे १ ते २३ जशाच्या तशा योजनांचा / उपक्रमांचा आराखडा / उपक्रम / कामे राबविणेस महासभा / प्रशासक ठराव क्र.१८५ दिनांक २७/०९/२०२४ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली होती. परंतु मागील सन २०२३-२४ व २०२४-२५ मध्ये महिला व बालकल्याणासाठी महापालिकेने १ ते २३ योजना राबविणेसाठी आराखडा तयार करून म.न.पा. अंदाजपत्रकात ५% राखीव निधीची तरतुद करून योजना राबविणेस व खर्च करणेस महासभेने मंजुरी प्रदान केलेली होती. त्यातील योजना क्र.१३ क्रीडा स्पर्धेतील विजेत्या महिला खेळाडूंना अर्थसहाय्य करणे संदर्भात योजना राबवितांना योजनेतील अनेक त्रुटी निदर्शनास आल्या व त्या त्रुटींना म.न.पा. प्रशासनास सामोरे जावे लागल्याने सन २०२३-२४ मधील क्रीडा स्पर्धेतील विजेत्या महिला खेळाडूंना अर्थसहाय्य करणे कामी योजनेत धोरण व नियमावली, श्रेणीनिहाय लक्षांक तसेच सदर योजनेवर एकुण १० लक्ष पर्यंत प्रतिवर्ष जास्तीत जास्त वार्षिक अनुज्ञेय खर्च मर्यादा असलेने आलेल्या अर्जांवर समिती गठीत करून एकुण ७२ विजेत्या महिला खेळाडूंना पुरस्कार अर्थसहाय्य देणे कामी मा. महासभा / प्रशासक ठराव क्र.२२१ दिनांक १५/०१/२०२५ अन्वये मंजुरी प्रदान करून ठराव पारित केलेला आहे.

त्याकरिता या चालु आर्थिक वर्षाकरिता म्हणजे सन २०२५-२६ वर्षाकरिता क्रीडा स्पर्धेतील विजेत्या महिला खेळाडूंना अर्थसहाय्य करणेसंदर्भातील योजनेत श्रेणीनिहाय क्रीडा खेळात शासन मान्यता प्राप्त खेळ कोणकोणते आहेत व जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्तरीय व आंतरराष्ट्रीय खेळ यामध्ये कोणकोणते खेळ समाविष्ट आहेत ते प्रथम प्रशासनास ठरविणे आवश्यक आहे. तसेच क्रीडा स्पर्धेतील विजेत्या महिला खेळाडूंच्या योजनेसाठी पात्र लाभार्थी निवडण्यासाठी प्रथम नियमावली, निकष व धोरण ठरविणे, पुरस्कार निवड

समिती गठीत करणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रथम योजनेत सुधारणा करावी लागणार आहे. योजनेप्रकरणी कार्यपध्दतीत व नियमावलीत बदल करणेसाठी, पुरस्कार निवड समिती गठीत करणे कामी निकष व धोरण निश्चित करणे कामी इकडील म.बा.क. कार्यालयाकडून वेळावेळी शासन निर्णय पारित झाल्याचे अनुषंगाने त्यांचे निर्देशांचा व सुचनांचा अभ्यासपूर्ण विचारविनिमय करून तद्नंतर त्याबाबत स्वतंत्र प्रस्ताव तयार करून क्रीडा स्पर्धेतील विजेत्या महिला खेळाडू महिलांसाठी अर्थसहाय्य योजनेचा प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करण्यात येईल. तरी सदरील यापूर्वीची योजना क्र.१३ ही सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामधील योजनांमधील आराखड्यामध्ये समाविष्ट करण्यात येत नसल्याबाबतचा प्रस्ताव महासभा / प्रशासक सभेपुढे मान्यतेस्तव सादर.

तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता महिला व बालकल्याणाकरीता सोबतच्या आराखड्याप्रमाणे १ ते २४ योजना / उपक्रम महिला व बालकल्याणाकरीता राबविणे कामी सन २०२५-२६ चे म.न.पा. अंदाजपत्रकात ५ % राखीव निधीची तरतुद म.बा.क. या लेखा शिर्षकाखाली करण्यात आलेली आहे.

| **योजना क्रमांक** | **योजनेचे नांव** |
|---|---|
| योजना क्र.१ | ८ मार्च जागतिक महिला दिन साजरा करणे. |
| योजना क्र.२ | कवयित्री बहिणाबाई जळगांव भुषण पुरस्कार. |
| योजना क्र.३ | लेक लाडकी या घरची योजना. |
| योजना क्र.४ | शिष्यवृत्ती योजना. |
| योजना क्र.५ | विधवा/निराधार महिलांच्या कन्या विवाहासाठी अर्थसहाय्य देणे. |
| योजना क्र.६ | महिला बचत गटाच्या माध्यमातुन कापडी पिशव्यांची निर्मिती करून विकत घेणे व नागरीकांना मोफत वितरीत करणे. |
| योजना क्र.७ | महानगरपालिका प्राथमिक शाळेतील व म.न.पा./बालवाडीतील विद्यार्थी यांना मोफत गणवेश, बुट मोजे वाटप करणे. |
| योजना क्र.८ | महानगरपालिका प्राथमिक शाळेतील व म.न.पा./बालवाडीतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत दप्तर , शैक्षणिक साहित्य, पाण्याची बॉटल, खेळांचे साहित्य व बेंचेस इत्यादी वाटप करणे. |
| योजना क्र.९ | दुर्धर आजाराने ग्रासलेल्या महिला व बालकांना (HIV ग्रस्त, कॅन्सरग्रस्त, अर्धांगवायू, क्षयरोग इत्यादी सारखे गंभीर आजार) झालेल्यांना NEFT, RTGS द्वारे उदरनिर्वाहाकरीता अर्थसहाय्य करणे. |
| योजना क्र.१० | मुलींना,महिलांना व महिला बचत गटांना व्यावसायिक रिटेल मॅनेजमेंटचे प्रशिक्षण देणे. |
| योजना क्र.११ | महिलांकरीता व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम राबविणे उदा. संभाषणकौशल्य, सभा धिटपणा, सुत्रसंचालन, इव्हेंट. |
| योजना क्र.१२ | गुणवंत विद्यार्थीनींचा गुणगौरव करणे. |
| योजना क्र.१३ | महिला व मुलींकरीता विविध स्पर्धांचे आयोजन करणे. |
| योजना क्र.१४ | महिला व मुलींच्या स्वयंरक्षणासाठी प्रशिक्षण देणे. |
| योजना क्र.१५ | आधार योजना ६५ वर्षावरील ज्येष्ठ महिला, विधवा, निराधार, परितक्त्या महिलांना उदरनिर्वाहासाठी अर्थसहाय्य करणे. |
| योजना क्र.१६ | महिला व बालकांसाठी असणाऱ्या योजनांच्या माहितीचा प्रचार करून जनजागृती करणे. |
| योजना क्र.१७ | महिला व बचत गट निर्मित खाद्य पदार्थ व इतर वस्तु विक्रीकरीता महोत्सव आयोजित करणे. |
| योजना क्र.१८ | महिला बचत गटांना व्यवसायाकरीता शिलाई मशिन, कांडप मशिन, शेवया मशिन इत्यादी मशिनसाठी अर्थसहाय्य देणे. |
| योजना क्र.१९ | बचत गटामार्फत उपहारगृह (कॅन्टीन) चालविणे. |
| योजना क्र.२० | महिला व बचत गटांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थांना कायमस्वरूपी विक्री केंद्र उपलब्ध करून देणे कामी अर्थसहाय्य करणे. |
| योजना क्र.२१ | मुली व महिला ई-दुचाकी, ऑटोरिक्षा (EV) करिता अर्थसहाय्य करणे. |
| योजना क्र.२२ | माझी कन्या माझा अभिमान योजना. |
| योजना क्र.२३ | मुलींसाठी / महिलांसाठी अत्याधुनिक स्वच्छतागृह बांधणे व दुरूस्ती करणे. |
| योजना क्र.२४ | म.न.पा. सार्वजनिक शौचालय, म.न.पा. शाळा, म.न.पा. बालवाडी इत्यादी ठिकाणी मुलींच्या / महिलांच्या प्रसाधनृहामध्ये सॅनिटरी नॅपकिन व्हेंडींग मशिन व सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करून देणे. |

प्रस्तुत प्रकरणी सन २०२५-२६ चे चालु आर्थिक वर्षात मागील सन २०२३-२४ व २०२४-२५ मधील दिव्यांगांच्या १ ते २४ मंजुर योजनांच्या आराखड्यातील योजना क्र.१३ क्रीडा स्पर्धेतील विजेत्या महिला खेळाडूंना अर्थसहाय्य करणे संदर्भातील ही योजना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील योजनांमधील आराखड्यामध्ये समाविष्ट करण्यात येत नसल्याबाबतच्या प्रस्ताव व उक्त नमुद अनुक्रमे १ ते २४ या योजनांच्या सोबतच्या आराखड्यास व आराखड्यानुसार योजना राबविणेस त्यासाठी येणारा खर्च म.न.पा. अंदाजपत्रकीय ५% म.बा.क.च्या राखीव निधीमधुन महिला व बालकल्याण या शिर्षकाखाली करणेकरीता प्रस्तावास मान्यतेकरिता सदर प्रस्ताव महासभा / प्रशासक सभेपुढे मान्यतेकरिता सादर.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन वैधानिक कार्यवाही करावी. लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाही, कायदेशीर अडचणी येणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच नियमांचे पालन करुन योजना कार्यान्वीत करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.४०** **(महासभा)**

**विषय क्र.:- १०** **प्रशासक ठराव क्र.:- ३०३** **दिनांक :- ११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचेकडिल जा.क्र./४६/२०२५ दि.१०/०७/२०२५
३. अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचा दि. १६/०६/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.२७/०६/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि. ०२/०७/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि. १०/०७/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** दिव्यांग व्यक्तिच्यां कल्याणाकरीता शासन निर्णयाप्रमाणे जळगांव महानगरपालिकेमध्ये १ ते १६ योजना / उपक्रमांचा आराखडा राबविणे संदर्भात प्रस्ताव.

---

वाचा क्र.१ व अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ हा फेब्रुवारी १९९६ पासुन अंमलात आलेला आहे. सदर कायद्याची अंमलबजावणी दिनांक १९/०४/२०१७ पासुन देशातील सर्व राज्यभरात करण्यात येत आहे. या कायद्यातील तरतुदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सर्व समावेशक आराखडा राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत तयार करण्यात आलेला आहे. हा आराखडा तयार करतांना राज्य स्तरारील विविध विभागामार्फत तयार करण्यात आलेला आहे. हा आराखडा तयार करतांना राज्य स्तरावरील विविध विभागांसोबत समन्वय साधुन तयार करण्यात आला आहे. राज्य शासनाने या संबंधात वेळोवेळी शासन निर्णय तथा परिपत्रक निर्गमित केले आहे जसे की, परिपत्रक क्र. संकिर्ण-१०/ २००२/ १५३/ प्र.क्र.१९/ नवि-२७ दिनाक २२/०३/२००२, परिपत्रक क्र. संकिर्ण-१०/२००२/१५३/प्र.क्र.१९/ नवि-२४७ दिनांक २२/०३/२००२, परिपत्रक क्र.संकिर्ण २०१०/प्र.क्र. १४६/२०१०/नवि-६ दिनांक ३०/१०/२०१० या परिपत्रकांमधुन राज्य शासनाचे नगरविकास विभागाने राज्यातील सर्व महानगरपालिकांना त्यांचे कार्यकक्षेत वर नमुद कायद्यान्वये कार्यक्रम तयार करून अंमलबजावणी करण्याबाबत सुचित केले आहे.

राज्यातील सर्व महानगरपालिका तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांनी या अधिनियम आणि परिपत्रकांचे आधारे आपआपल्या स्तरावर त्यांचे कार्यक्षेत्रात अपंग व्यक्तींसाठीचे धोरण ठरवून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. जळगांव महानगरपालिका कार्यक्षेत्रातही शहरातील अपंगांना योग्य न्याय देता यावा, त्यांच्या प्रश्नांवर मार्ग काढता यावा, त्यांना सक्षम बनविता यावे, सामान्य संधी देता याव्यात, सामान्य जणांप्रमाणे समाजाच्या मुख्य प्रवाहात संपूर्ण सहभाग त्यांना मिळावा या उद्देशाने धोरण ठरविण्यात येत आहे. उपरोक्त १९९५ च्या अधिनियमाचे अधिन राहुन यातील प्रामुख्याने कलम क्र.४०,४२,४३,४५ आणि ४६ नुसार, तसेच राज्य शासनाकडून निर्गमित मार्गदर्शक परिपत्रकातील घटकांस अनुसरून पुढील प्रमाणे धोरण प्रस्तावित करण्यात येत आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ३७ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांचा ५% निधी दिव्यांग कल्याणासाठी राखुन ठेवुन विविध योजनांमध्ये दिव्यांगांसाठी ५% आरक्षण देणेबाबत निर्देश दिलेले आहेत. या अनुषंगाने नगरविकास विभागाचे दिनांक १०/०५/२०१८ च्या शासन निर्णयानुसार व ग्रामविकास विभागाचे दि.२५ जून २०१८ च्या अधिनस्त स्थानिक स्वराज्य संस्थांना ५% निधी दिव्यांग कल्याणार्थ राखुन ठेवून खर्च करणे बाबत सुचना निर्गमित केलेल्या आहेत. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिव्यांग कल्याणासाठी ५% निधी राखुन ठेवून सदर निधी दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणाच्या / पुनर्वसनाच्या विविध योजनांसाठी खर्च करावयाचा आहे. या राखीव निधीमधुन अपंगांसाठी सार्वजनिक स्वरूपात तसेच वैयक्तिक स्वरूपात लाभ देण्याचे नियोजन आहे. अधिनियमातील कलम ४० नुसार महानगरपालिकेच्या गरीबी निर्मुलनासाठी असणाऱ्या सर्व योजनांमध्ये किमान ५% निधी हा अपंगांसाठी राखुन ठेवावा अशा सुचना आहेत.

जळगांव महानगरपालिकेने दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणाकरीता शासनामार्फत वेळावेळी शासन निर्णय पारित करण्यात आल्याच्या अनुषंगाने दिव्याग व्यक्तींची कल्याणाकरीता तसेच दिव्यांग व्यक्तींना दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडी-अडचणींची तिव्रता कमी करण्याच्या हेतुने सन २०२३-२४ मध्ये म.न.पा. ठराव क्र.१११७ दिनांक ३०/०५/२०२३ अन्वये १ ते १७ अनुक्रमे योजना / उपक्रमांचा आराखडा तयार करून अंदाजपत्रकात ५% राखीव निधीची तरतुद करून त्या योजना राबविणेस व त्यांची अंमलबजाणी करणेस मान्यता प्रदान करण्यात आलेली होती. तद्नंतर त्याच ठरावात नमुद केलेल्या मंजुर आराखड्यातील अनुक्रमे १ ते १७ जशाच्या तशा योजना सन

२०२४-२५ मध्ये अंदाजपत्रकात ५% ची तरतुद करून योजना राबविणेस व त्यांची अंमलबजाणी करणेस म.न.पा. महासभा / प्रशासक ठराव क्र.१८६ दिनांक २७/०९/२०२४ अन्वये मागील वर्षी मंजुरी प्रदान करण्यात आलेली होती. परंतु या सन २०२५-२६ चे चालु आर्थिक वर्षात मागील सन २०२३-२४ व २०२४-२५ मधील दिव्यांगांचे कल्याणाकरीता महासभा ठरावानुसार मंजुर करण्यात आलेली योजना क्र.२ क्रीडा स्पर्धेतील विजेत्या दिव्यांग खेळाडूंना अर्थसहाय्य करणे याच धरतीवर महिला बालकल्याण योजनेमधील क्रीडा स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना अर्थसहाय्य करणे. बाबतच्या योजनेमध्ये या योजनेची अंमलबजावणी करतांना योजनेत अनेक त्रुटी प्रशासनाच्या निदर्शनास आलेल्या आहेत. त्यामुळे या योजनेची अंमलबजावणी करणे प्रशासनास सहजरित्या शक्य झालेली नसल्याने त्याकरिता या चालु आर्थिक वर्षाकरिता म्हणजे सन २०२५-२६ वर्षाकरिता क्रीडा स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना अर्थसहाय्य करणेसंदर्भातील योजनेत श्रेणीनिहाय क्रीडा खेळात शासन मान्यता प्राप्त खेळ कोणकोणते आहेत व जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळ यामध्ये कोणकोणते खेळ समाविष्ट आहेत ते प्रथम प्रशासनास ठरविणे आवश्यक आहे. तसेच क्रीडा स्पर्धेतील विजेत्या दिव्यांग खेळडूंच्या योजनेसाठी पात्र लाभार्थी निवडण्यासाठी प्रथम नियमावली, निकष व धोरण ठरविणे, पुरस्कार निवड समिती गठीत करणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रथम योजनेत सुधारणा करावी लागणार आहे. योजनेप्रकरणी कार्यपध्दतीत व नियमावलीत बदल करणेसाठी, पुरस्कार निवड समिती गठीत करणे कामी निकष व धोरण निश्चित करणे कामी इकडील म.बा.क. अंतर्गत असलेल्या दिव्यांग विभाग कार्यालयाकडून वेळोवेळी शासन निर्णय पारित झाल्याचे अनुषंगाने त्यांचे निर्देशांचा व सुचनांचा अभ्यासपूर्ण विचारविनिमय करून तद्नंतर त्याबाबत स्वतंत्र प्रस्ताव तयार करून क्रीडा स्पर्धेतील विजेत्या दिव्यांग खेळाडूंना अर्थसहाय्य योजनेचा प्रस्ताव महासभेपुढे सादर करण्यात येईल.

तरी सदरील यापूर्वीची योजना क्र.२ क्रीडा स्पर्धेतील `विजेत्या दिव्यांग खेळाडूंना अर्थसहाय्य` ही सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामधील योजनांमधील आराखड्यामध्ये समाविष्ट करण्यात येत नसल्याबाबतचा प्रस्तावास मान्यतेकामी तसेच सन २०२५-२६ चे चालु आर्थिक वर्षात मागील सन २०२३-२४ व २०२४-२५ मधील दिव्यांगांच्या १ ते १७ मंजुर योजनांच्या आराखड्यातील योजना क्र.८ शाळेत जावु न शकणाऱ्या दिव्यांग मुले / मुलींना अर्थसहाय्य या योजनेमधील योजनेचे स्वरूप व निकषानुसार पात्र दिव्यांग लाभार्थी योजना क्र.७ नुसार या योजनेत अर्थसहाय्याचा लाभ घेत असलेने ही योजना नव्याने या चालु आर्थिक वर्षात समाविष्ट करणे योग्य होणार नसल्याने सदरील शाळेत जावु न शकणाऱ्या दिव्यांग मुले व मुलींना अर्थसहाय्य योजना ही या आराखड्यामध्ये समाविष्ट करणेत येत नसलेबाबतचा प्रस्ताव मान्यता करिता प्रस्ताव महासभा / प्रशासक सभेपुढे मान्यतेकामी.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम १६ नुसार तत्सम शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी अपंग व्यक्तींना आवश्यक संसाधने, मदत पुरविण्यासाठी योजना तयार करून त्यांची अंमलबजावणी करावयाची आहे. या अंतर्गत जळगांव महानगरपालिकेच्या वतीने खालील १ ते १६ घटक योजनांचा आराखडा / उपक्रम राबविणे कामी जळगांव महानगरपालिकेने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात हा निधी अंदाजपत्रकात दिव्यांग निधी ५% राखुन ठेवलेला आहे.

| योजना क्रमांक | योजनेचे नांव |
|---|---|
| योजना क्र.१ | ३ डिसेंबर `जागतिक अपंग दिन` साजरा करणे. |
| योजना क्र.२ | शिष्यवृत्ती योजना |
| योजना क्र.३ | दिव्यांग व्यक्तींच्या मागणीनुसार त्यांना व्यवसाय करण्याकरीता अर्थसहाय्य. |
| योजना क्र.४ | दिव्यांगांच्या लग्नाकरीता अर्थसहाय्य. |
| योजना क्र.५ | ६० वर्ष व त्यावरील दिव्यांग व्यक्तींकरीता पेन्शन योजना. |
| योजना क्र.६ | दिव्यांग व्यक्तींना चलन, वलन साधनांकरीता अर्थसहाय्य. |
| योजना क्र.७ | दिव्यांग व्यक्ती उदरनिर्वाह / रेशनापोटी अर्थसहाय्य करणे. |
| योजना क्र.८ | दिव्यांग बचत गटांना अर्थसहाय्य (बचत गटातील ७०% सदस्य दिव्यांग) |
| योजना क्र.९ | दिव्यांग व्यक्तींना मुलभुत सोई सुविधा निर्माण करणे. |
| योजना क्र.१० | सुवर्ण नगरी दिव्यांग समाज सेवा पुरस्कार. |
| योजना क्र.११ | दिव्यांग व्यक्तींना घरकुल अर्थसहाय्य योजना. |
| योजना क्र.१२ | दिव्यांग व्यक्तींना प्रशिक्षण देणे. |
| योजना क्र.१३ | दिव्यांग माहिती, शिक्षण व संपर्क योजना (IEC) |
| योजना क्र.१४ | दिव्यांग व्यक्तींकरीता आरोग्य, धनसंपदा योजना. |
| योजना क्र.१५ | दिव्यांग व्यक्तींकरीता आरोग्य, धनसंपदा योजना. |
| योजना क्र.१६ | दिव्यांग व्यक्तींच्या नोंदणीकृत संस्थांना अर्थसहाय्य करणे. |

प्रस्तुत प्रकरणी सन २०२५-२६ चे चालु आर्थिक वर्षात मागील सन २०२३-२४ व २०२४-२५ मधील दिव्यांगांच्या १ ते १७ मंजुर योजनांच्या आराखड्यातील योजना क्र.२ क्रीडा स्पर्धेतील `विजेत्या दिव्यांग खेळाडूंना अर्थसहाय्य` ही सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामधील योजनांमधील आराखड्यामध्ये समाविष्ट करण्यात येत नसल्याबाबतचा प्रस्तावास मान्यता व योजना क्र.८ शाळेत जावु न शकणाऱ्या दिव्यांग मुले / मुलींना अर्थसहाय्य या योजनेमधील योजनेचे स्वरूप व निकषानुसार पात्र दिव्यांग लाभार्थी योजना क्र.७ नुसार या योजनेत अर्थसहाय्याचा लाभ घेत असलेने ही योजना नव्याने या चालु आर्थिक वर्षात समाविष्ट करणे योग्य होणार नसल्याने सदरील शाळेत जावु न शकणाऱ्या दिव्यांग मुले व मुलींना अर्थसहाय्य योजना ही या आराखड्यामध्ये समाविष्ट करणेत येत नसलेबाबतचा प्रस्तावास तसेच उक्त नमुद अनुक्रमे १ ते १६ या योजनांच्या आराखड्यास व आराखड्यानुसार योजना राबविणेस त्यासाठी येणारा खर्च म.न.पा. अंदाजपत्रकीय ५% दिव्यांगांच्या राखीव निधीमधून दिव्यांग निधी या शिर्षकाखाली करणेकरीता प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावातील अ.क्रं.१० ची योजना वगळून प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन वैधानिक कार्यवाही करावी. लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाही, कायदेशीर अडचणी येणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच नियमांचे पालन करुन योजना कार्यान्वीत करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४०** **(महासभा)**

विषय क्र.:- **११** प्रशासक ठराव क्र.:- **३०४** दिनांक :-**११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचेकडिल जा.क्र./४७/२०२५ दि.१०/०७/२०२५
३. अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचा दि. ०५/०५/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.२३/०५/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि. २८/०५/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि. २५/०६/२०२५ चा अभिप्राय

**विषय :- मुद्दा क्र.(अ)** महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.१३ सप्टेंबर २०२२ व दि.२७ जून २०२४ चे परिपत्रकाचे अनुषंगाने फक्त परमनंट UDID कार्डधारक (वैश्विक ओळखपत्रधारक) यांनाच योजना क्र.५ व ७ नुसार लाभ देणे बाबत महासभा / प्रशासकीय ठराव क्र.२३९ दि.१३/०२/२०२५ अन्वये मान्यता प्रदान करणेत आली. त्यानुसार आदेश / जा.क्र./आ.का./३८१० दिनांक १३/०३/२०२५ अन्वये पारित करण्यात आलेले आहे. त्यानुसार एकुण ९९६ परमनंट UDID कार्डधारक दिव्यांग लाभार्थींना अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे. तद्नंतर म्हणजे दि.१७/०२/२०२५ चे प्रस्तावानंतर सन २०२४-२५ मधील एकुण ७४ परमनंट UDID दिव्यांग लाभधारकांनी योजना क्र.७ करिता उशीराने अर्थसहाय्य मिळणे कामी अर्ज सादर केलेले आहे. त्या एकुण ७४ परमनंट दिव्यांग UDID धारकांना महासभा / प्रशासक ठराव क्र.२३९ दिनांक १३/०२/२०२५ चे पारित ठरावाचे अनुषंगाने रू.१२,०००/- प्रती दिव्यांग या प्रमाणे मंजुर झालेल्या अर्थसहाय्याप्रमाणेचा लाभ देणे आहे. सदरचा खर्च हा सन २०२५-२६ मधील म.न.पा. च्या अंदाजपत्रकातील २.५० कोटी च्या मंजुर राखीव दिव्यांग निधीमधून खर्ची घालुन देणे आहे. तसेच

**मुद्दा क्र. (ब) :-** नव्याने प्राप्त झालेल्या एकुण १२ तात्पुरते दिव्यांग प्रमाणपत्र धारकांनी / युडीआयडी कार्ड धारकांनी इकडील दिव्यांग विभागाकडे अर्थसहाय्य मिळणेकामी मागणी अर्ज सादर केलेले आहेत त्यांच्या नावांची यादी प्रकरणी जोडण्यात आलेली आहे. त्या दिव्यांग धारकांना महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्र.दिव्यांग-२०२१/प्र.क्र.५४/दि.क.२ मुंबई दिनांक १३ सप्टेंबर २०२२ अन्वये मधिल निकष क्र.८ नुसार ``ज्या दिव्यांग व्यक्ती कायमस्वरूपी दिव्यांगांचे प्रमाणपत्रधारक नाही अशा दिव्यांग व्यक्तींना म्हणजे तात्पुरते दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्रधारक व्यक्तींना शासनाच्या कायमस्वरूपी लाभाच्या योजनांचे लाभ अनुज्ञेय नसलेने`` परिपत्रकाच्या अनुषंगाने योजना क्र.७ नुसार UDID दिव्यांग नोंदणी केलेल्या कार्डधारकांना लाभ द्यावयाचा किंवा कसे?

याबाबत प्रस्तुत प्रकरणी प्रस्तावित **अ** व **ब** मध्ये नमुद केलेल्या बाबींवर निर्णय होणे कामी प्रस्ताव महासभेपुढे मान्यतेस्तव.

---

**वाचा क्र.१ व अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,**

महासभा ठराव क्र.१११७/दिनांक ३०/०५/२०२३ मधील योजना क्र.७ मध्ये प्रतिलाभार्थी रू.३०००/- ऐवजी प्रति लाभार्थी रक्कम रू.१२,०००/- या प्रमाणे तरतुदीत बदल करणे बाबत सन २०२३-२४ करिता म.न.पा. महासभा/प्रशासकीय ठराव क्र.७८ दिनाक १३/०३/२०२४ मान्यता प्रदान केल्याप्रमाणे या आर्थिक वर्षात सुध्दा म्हणजे सन २०२४-२५ करिता सुध्दा म.न.पा. प्रशासकीय ठराव क्र.१८६ दिनांक २७/०९/२०२४ अन्वये जशाच्या तशा योजना अनुक्रमे १ ते १७ योजनांना मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. त्यात योजना क्र.७ मध्ये वार्षिक अनुज्ञेय खर्च रू.५० लक्ष ऐवजी रू.२ कोटी करणे व प्रतिलाभार्थी रू.३०००/- ऐवजी प्रति लाभार्थी रक्कम रू.१२,०००/- या प्रमाणे तरतुदीत बदल करणे बाबत प्रस्तुत विषयानुसार संदर्भांकित नमुद केल्याचे अनुषंगाने इकडील म.बा.क. अंतर्गत असलेल्या दिव्यांग विभागाकडून प्रस्ताव पृष्ठ क्र. १ ते ९ वर सादर करण्यात आलेला होता. त्या प्रस्तावावर आयुक्त तथा प्रशासक यांनी दिनांक २४/०१/२०२५ रोजी त्यावर दिलेल्या निर्देशान्वये सन २०२४-२०२५ पात्र लाभार्थी यादी तपासुन सादर करणे संदर्भात आदेशित केल्याप्रमाणे योजना क्र.७ दिव्यांग व्यक्ती उदरनिर्वाह / रेशनापोटी अर्थसहाय्य रू.३०००/- ऐवजी प्रति लाभार्थी रक्कम रू.१२०००/- या प्रमाणे सन २०२४-२५ आर्थिक वर्षात सुध्दा लाभ देणे संदर्भात फेरप्रस्ताव दिनांक ११/०२/२०२५ रोजी सादर करण्यात आला होता.

सदरच्या प्रस्तावास महासभा / प्रशासक ठराव क्र.२३९ दि.१३/०२/२०२५ अन्वये मध्ये नमुद केल्याप्रमाणे वाचा क्र.१ ते ५ नुसार महाराष्ट्र म.न.पा. अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मंजुरी देण्यात येत असलेबाबत व विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखापरिक्षणात आक्षेप येणार नाही याची दक्षता घ्यावी असे नमुद करून ठराव मंजुर करण्यात आल्याप्रमाणे सदर ठरावाचे

अनुषंगाने म.न.पा. दवाखाना विभागाकडे दिव्यांग बांधवांनी नोंदणी केलेली असेल अशांनी कागदपत्रांचे पडताळणी करीता व त्याचे अद्यावतीकरण करीता म.न.पा.चे दिव्यांग विभागाकडून दैनिक वर्तमानपत्रात जाहीर सुचना प्रसिध्दीस देण्यात आली होती. त्यानुसार म.न.पा. दवाखाना विभागाकडील दिव्यांग नोंदणी संख्या एकुण १९६७ पैकी अद्ययावत कागदपत्रे सादर केलेली एकूण ९९६ परमनंट UDID नोंदणी कार्डधारक दिव्यांग बांधवांना अर्थसहाय्य रू.१२०००/- प्रति दिव्यांग या प्रमाणे त्यांना लाभ देणेस व तसेच एकुण १८३ तात्पुरते UDID दिव्यांग नोंदणी कार्डधारक यांना अर्थसहाय्याचा लाभ व देणे बाबत मान्यता प्रदान करण्यात आल्याचे अनुषंगाने परमनंट UDID नोंदणी दिव्यांग कार्डधारक यांनाच योजना क्र.७ करिता लाभ देणे असल्याचे एकुण ९९६ दिव्यांग व्यक्ती x रू.१२०००/- प्रती दिव्यांग = १,१९,५२,०००/- इतका दिव्यांग निधी योजना क्र.७ करिता सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील म.न.पा. अंदाजपत्रकीय दिव्यांग निधी मधुन खर्च करणेस व सोबतच्या परमनंट UDID नोंदणी दिव्यांग कार्डधारक बांधव / लाभार्थी यादी प्रमाणे अर्थसहाय्य लाभाची रक्कम DBT द्वारे त्यांचे बँक खात्यावर जमा करून त्यांना लाभ देणे कामी इकडील दिव्यांग विभागाचे दिनांक १७/०२/२०२५ चे प्रस्तुत प्रतिवेदनास आयुक्त तथा प्रशासक यांनी दिनांक १३/०३/२०२५ रोजी ठरावाचे अनुषंगाने मान्यता प्रदान करण्यात आली. तथापि ;

- ❖ महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्र..दिव्यांग-२०२१/प्र.क्र.५४/दि.क.२ मुंबई दिनांक १३ सप्टेंबर २०२२ ``दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील समाविष्ट झालेल्या २१ दिव्यांगत्वाच्या प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना राज्य शासन व तत्सम यंत्रणांच्या योजना, सवलती, लाभ घेण्याकरीता ग्राह्य ठरविणे बाबत`` अन्वये मधील निकष क्र.८ नुसार :- ``ज्या दिव्यांग व्यक्ती कायमस्वरूपी दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्रधारक आहेत, त्यांना शासनाच्या कायमस्वरूपी लाभाच्या योजनांचे लाभ अनुज्ञेय राहतील. तर ज्या दिव्यांग व्यक्ती ठराविक कालावधीकरिता दिव्यांग प्रमाणपत्र धारण करतात, त्या दिव्यांग व्यक्तींना दिव्यागत्वाच्या प्रमाणपत्रातील नमुद कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरूपात अंमलात असलेल्या योजनांचे लाभ अनुज्ञेय राहतील.``
- ❖ महाराष्ट्र शासन दिव्यांग विभाग शासन परिपत्रक क्र.: दिव्यांग २०२४/प्र.क्र.८६/दि.क.२ मंबई दिनाक २७ जून २०२४ `` केंद्र शासनाच्या धरतीवर दिव्यांगत्वासंदर्भातील सर्व लाभ मिळविण्यासाठी वैश्विक ओळखपत्र (Unique Disability Identity Card-UDID Card) बंधनकारक करणेबाबत``अन्वये.

शासन परिपत्रक निर्गमित केलेले आहे. वरील दोन्ही महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक १३ सप्टेंबर २०२२ व दिनांक २७ जून २०२४ अन्वयेच्या परिपत्रकाच्या अनुषंगाने फक्त परमनंट युडीआयडी कार्डधारक (वैश्विक ओळखपत्र धारक) यांनाच योजना क्र. ५ व ७ नुसार लाभ देणे बाबत मा.आयुक्त तथा प्रशासक यांचेकडील आदेश क्र./जा.क्र./आ.का./३८१०/ दि.१३/०३/२०२५ अन्वये आदेश पारित केलेत. त्या अनुषंगाने परमनंट दिव्यांग व्यक्तींचे / लाभार्थीचे बँक खाती BDT द्वारे अर्थसहाय्याची रक्कम अर्थ विभागाकडील जा.क्र./अर्थ/८९८ दिनांक २७/०३/२०२५ रोजी DA Letter द्वारे वर्ग करण्याची कार्यवाही अर्थ विभागाकडून करण्यात आलेली आहे.

परंतु तद्नंतर इकडील दिव्यांग विभागाकडील दिनांक १७/०२/२०२५ चे प्रस्तावानंतर सन २०२४-२५ मधील कायमस्वरूपी दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक तसेच युडीआयडी कार्डधारक दिव्यांग व्यक्तींनी योजना क्र.७ नुसार दिव्यांग व्यक्ती उदरनिर्वाह / रेशनापोटी अर्थसहाय्याचा लाभ सन २०२४-२५ मधील मिळणेकामी एकुण नव्याने ७४ परमनंट दिव्यांग धारकांनी उशीराने मागणी अर्ज सादर केलेले आहेत.

**मुद्दा क्र. (अ) :-** त्या अनुषंगाने दिव्यांग विभाचे दिनांक १७/०२/२०२५ चे प्रस्तावानंतर म्हणजे मुदतीनंतर सन २०२४-२५ मधील परमनंट दिव्यांग लाभ धारकांना जर योजना क्र.७ करिता दिव्यांग व्यक्ती उदरनिर्वाह/रेशनापोटी अर्थसहाय्य प्रती दिव्यांग रू.१२०००/- याप्रमाणे प्रती परमनंट दिव्यांग लाभार्थी यांना त्यांचे बँक खात्यावर DBT द्वारे म. महासभा / प्रशासकीय ठराव क्र.२३९ दिनांक १३/०२/२०२५ चे मंजुर ठरावान्वये लाभ द्यावयाचा झाल्यास एकुण ७४ परमनंट दिव्यांग व्यक्ती x १२०००/- प्रती दिव्यांग याप्रमाणे एकुण रू.८,८८,०००/- इतका खर्च येईल व सदरचा खर्च हा सन २०२५-२६ मधील म.न.पा.चे अंदाजपत्रकील २.५० कोटी मंजुर दिव्यांग निधीमधुन सदरची एकुण रक्कम खर्ची घालुन लाभ द्यावा लागेल. त्याकरिता नव्याने मा. महासभा / प्रशासकीय ठरावान्वये मंजुरी घ्यावी लागेल तद्नंतरच लाभ देणे उचित राहील.

**मुद्दा क्र. (ब) :-** नव्याने प्राप्त झालेल्या एकुण १२ तात्पुरते दिव्यांग प्रमाणपत्र धारकांनी / युडीआयडी कार्ड धारकांनी इकडील दिव्यांग विभागाकडे अर्थसहाय्य मिळणेकामी मागणी अर्ज सादर केलेले आहेत त्या दिव्यांग धारकांना महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्र.दिव्यांग-२०२१/प्र.क्र.५४/दि.क.२ मुंबई दिनांक १३ सप्टेंबर २०२२ अन्वये मधील निकष क्र.८ नुसार ``ज्या दिव्यांग व्यक्ती कायमस्वरूपी दिव्यागांचे प्रमाणपत्रधारक नाही अश्या दिव्यांग व्यकतींना म्हणजे तात्पुरते दिव्यांगाचे प्रमाणपत्रधारक व्यक्तींना शासनाच्या कायमस्वरुपी लाभाच्या योजनांचे लाभ अनुज्ञेय नसलेने`` परिपत्रकाच्या अनुषंगाने योजना क्र.७ नुसार अर्थसहाय्याचा लाभ देता येणार नाही.

तरी प्रस्तुत प्रकरणातील मुद्दा क्र. अ व ब मधील दोनही बाबी ह्या धोरणात्मक व आर्थिक स्वरूपाच्या असल्याकारणाने याप्रकरणी महासभा / प्रशासक सभेपुढे उचित निर्णयास्तव व मान्यता मिळणेसाठी अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त मुद्दा क्र. ब वगळता मुद्दा क्र. अ मधील प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन शासन नियमानूसार वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशीर अडचणी येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४०** **(महासभा)**

**विषय क्र.:- १२** **प्रशासक ठराव क्र.:- ३०५** **दिनांक :-११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./४०७/२०२५ दि.१०/०७/२०२५

३. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा दि.३०/०६/२०२५ चा अभिप्राय

४. अतिरिक्त आयुक्त यांचा दि. ३०/०६/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य योजने अंतर्गत शहरातील ०१ ते ९४ विकास कामे कार्यकारी अभियंता सार्वजनीक बांधकाम विभाग यांचे मागणी नुसार ०१ ते ९४ कामांना ना - हरकत दाखला देणे व सार्व बांधकाम विभागा मार्फत सदरचे कामे करण्यास मान्यता देणे.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

कार्यकारी अभियंता सार्व. बांधकाम विभाग, जळगांव यांचे पत्र क्रं. साबांविज/प्रशा-१/३३८१/२०२५ दि.२३/०६/२०२५ चे पत्र प्राप्त झाले त्यानुसार सोबत परिशिष्ट अ मध्ये नमुद ०१ ते ९४ कामे महानगरपालिकेची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य योजने अंतर्गत रक्कम रु.१००.०० कोटीमंजुर झालेले असल्याचे पत्रात नमुद आहे. त्या अनुषंगाने सार्व बांधकाम विभागाने महानगरपालिकेकडुन ना-हरकत प्रमाणपत्र व ठराव मिळण्याबाबत विनंती केलेली आहे .

उक्त परिशिष्ट अ मध्ये नमुद ०१ ते ९४ कामांना सार्व. बांधकाम विभाग यांच्या मागणी नुसार कामांना ना- हरकत दाखला खाली नमुद अटी शर्तीच्या अधिन राहुन देण्यास व परिशिष्ट अ मध्ये नमुद ०१ ते ९४ कामे सार्व बांधकाम विभाग, जळगांव यांच्या मार्फत कार्यान्वयन यंत्रणा म्हणुन करण्याबाबत प्रस्ताव सादर केला असता आयुक्त यांनी दि.२६/०६/२०२५ रोजीच्या मान्यतेनुसार पत्र क्रं. जशमनपा /साबा/३३८ दि.२६/०६/२०२५ अन्वये सार्वजनीक बांधकाम विभागास सदरचे कामे करण्याकरीता खालील अटीशर्तीस अधिनराहुन ना-हरकत दाखला देण्यात आलेला आहे. परंतु वर नमुद पत्रा नुसार ठराव पारीत करुन मिळण्याबाबत विनंती केलेली आहे. त्यानुसार सोबतच्या परिशिष्ट अ मध्ये नमुद कामांसंदर्भात महासभा/प्रशासक यांची सभेची मान्यता होण्या करीता सादर

१. प्रमाणित करण्यात येते की , कामाची जागा मनपा कब्जेवहीवाटीतील आहे.
२. प्रमाणित करण्यात येते की, काम आपल्या कार्यालयाकडून पूर्ण झाल्यानंतर मनपाकडे हस्तांतरीत झाल्यानंतर कामाची दोष दायीत्व पुर्ण झाल्यानंतर त्याची देखभाल व दुरुस्ती मनपा जळगांव मार्फत करण्यात येईल.
३. प्रमाणित करण्यात येते की, प्रस्तावित केलेले काम कोणत्याही योजनेतुन मंजुर अथवा प्रस्तावित नाही.
४. प्रमाणित करण्यात येते की, प्रस्तावित केलेल्या कामांची जागा अतिक्रमण विरहीत आहे.
५. महानगरपालिका हद्दीत रस्ते विकास करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम (२०२) नुसार नियोजन प्राधिकरण महानगरपालिका आहे.
६. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ६६-अ मधील (२) नुसार सदरचे काम अन्य प्राधिकरण कडुन करणेकामी राज्य शासनाची मान्यता घेणे अनिवार्य आहे.
७. प्रस्तावित केलेली कामे महानगरपालिका हद्दीतील असुन आवश्यक आहेत.
८. ज्या रस्त्यांवर भुमिगत गटारींचे काम झालेले नाही अश्या रस्त्यांच्या क्रॉक्रीटीकरणाच्या प्रस्तावात सदर रस्त्यावर भविष्यात भुमिगत गटारी साठी खोदकाम करण्यात येणार असलेने त्यासाठी रस्त्यांचे नुकसान होणार नाही अश्या प्रकारचे नियोजन करणे व त्याकरीता आवश्यक बाबींचा समावेश अंदाजपत्रकीय प्रस्तावात करणे आवश्यक राहील.
९. रस्त्यावर मलनिस्सार योजनेचे असलेली मुख्य चेंबर व घरजोडणी चेंबर कोणत्याही परिस्थितीत रोड खाली दबाई होणार नाही याची दक्षता घ्यावी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार पाणी पुरवठा व मलनिस्सारण सेवा अत्यावश्यक सेवेत समाविष्ट असल्याने अशी कृती नियमांचे उल्लंघन करणारी ठरेल रस्त्याखाली दबाई झाल्यास आपण नियुक्त केलेले मक्तेदार यांनी तात्काळ स्वखर्चाने पुर्ववत व सुस्थितीत करण्याचे नियोजन ठेवणे आवश्यक राहील याची नोंद घ्यावी.

१०. सदर रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करण्यासाठी रोड स्क्रपींग करणे , खोदकाम करणे, हि कामे करीत असतांना जलवाहीनीची अथवा नागरीकांचे नळ संयोजनचे कोणतेही नुकसान झाल्यास, तुट फुट झाल्यास, त्याची तात्काळ दुरुस्ती करणे आवश्यक राहील

११. रस्त्याचे काम करतांना त्या रस्त्यावरील भुमिगत मलनिस्सारण योजनेची चेंबर असल्यास त्याची तुट फुट होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक राहील, तसेच सदर चेंबर रस्त्याच्या पृष्ट भागाशी समतल करणे आवश्यक राहील व त्यासाठी अंदाजपत्रकात देखिल तरतुद करणे आवश्यक राहील.

१२. प्रस्तावातील कोणत्याही रस्त्याचे काम सुरु करण्यापुर्वी सात दिवस आधी सुचित करणे आवश्यक राहील, त्यामुळे त्या रस्त्यावरील पाईपलाईन दुरुस्ती नळ संयोजन अथवा इतर आवश्यक कामे मनपा मार्फत पुर्ण करुन घेणे शक्य होईल

१३. रस्त्यांची कामे करतांना दोन्ही बाजुस निचरा व्यवस्था, Uitility Duct ची आवश्यक कामे करणे जरुरीचे असल्याने सदर कामे प्रस्तावित करुन करावी लागतील

१४. सदर रस्त्याची कामे करतांना वाहतूकीस नियंत्रणासाठी पर्यायी व्यवस्था, संरक्षणात्मक व्यवस्था, रस्त्यांचा पृष्टभागा समतळ करणे, रस्त्याच्या विकासा संबंधी आवश्यक असलेली संलग्न सर्व कामे प्रस्तावित करणे आवश्यक राहील

१५. रस्त्याची कामे करतांना रस्ता संपुर्ण रुंदीसाठी तयार करण्यात यावा. तसेच रस्त्याला जोड रस्त्याशी जोडतांनाआवश्यक उतार तयार करण्याची गरज असल्यास मक्तेदारा मार्फत काम करुन घेण्याची आवश्यक तरतुद ठेवण्यात यावी.

१६. सदरचे कामे १००% अनुदान योजनेतून करणेकामी ना- हरकत देण्यात येत आहे.

१७. सदरची कामे तांत्रिक दृष्टया आवश्यक गुणवत्ता राखुन पुर्ण करावी कामाची गुणवत्ता योग्य नसल्याचे दिसुन आल्यास सदर कामाचे हस्तांतरण महानगरपालिकेने घेणे बंधनकारक राहणार नाही, सदर दोषनिवारण करण्याची जबाबदारी आपली राहील.

१८. महानगरपालिकेने अमृत १.० अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिस्सारण योजनेची कामे पूर्ण केलेल्या भागातच नवीन रस्त्यांची कामे प्रस्तावीत करावी. कामे प्रस्तावित करतांना अमृत १.० व अमृत २.० योजनेतून नियोजित कामे पुर्ण झाल्यानंतरच रस्त्यांची कामे करावी.

सदरची कामे करणेपूर्वी महानगरपालिकेस पुर्वसुचना देवून परवानगी घेतल्यानंतरच प्रत्यक्षात जागेवर कामास सुरूवात करावी महानगरपालिका यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य योजने अंतर्गत शहरातील ०१ ते ९४ विकास कामे कार्यकारी अभियंता सार्वजनीक बांधकाम विभाग यांचे मागणी नुसार सोबतच्या परिशिष्ट "**अ**" मधील ०१ ते ९४ कामांना ना -हरकत दाखला देणे व सार्व बांधकाम विभागा मार्फत सदरचे कामे करण्यास मान्यता देणेबाबत मान्यता मिळणेसाठी शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशीर अडचणी येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४०** **(महासभा)**

**विषय क्र.:- १२** **प्रशासक ठराव क्र.:- ३०५** **दिनांक :-११/०७/२०२५**

**महानगरपालिका यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात**
**नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य योजने अंतर्गत**
**परिशिष्ट "अ"**

| अ.क्रं. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | कोर्ट चौक ते गणेश कॉलनी ते बजरंग बोगदा |
| २. | इच्छादेवी चौक ते बेंडाळे चौक |
| ३. | डी मार्ट चौक ते रामानंद नगर स्टॉप |
| ४. | भोईटे नगर ब्रिज ते सिंधी कॉलनी |
| ५. | स्वातंत्र चौक ते एम जे कॉलेज |
| ६. | नेहेरु चौक ते रेल्वे स्टेशन ते शिवाजी चौक |
| ७. | स्वातंत्र चौक ते अग्रवाल हॉस्पिटल ते ऑफिसर क्लब |
| ८. | चंदू आण्णा नगर ते खोटे नगर स्टॉप |
| ९. | खेरनार ऑप्टिकल ते रथ चौक |
| १०. | स्वातंत्र चौक ते आण्णाभाऊ साठे चौक |
| ११. | ब्राम्हण सभा ते टी व्ही एस शोरुम |
| १२. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत गणेश डिवाईन ते अथर्व अपार्टमेंट पर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| १३. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत अथर्व कॉलनी गणपती मंदिर ते श्री सागर पाटील यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| १४. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत आशाबाबा नगर येथील श्री प्रकाश गजाकुश यांच्या घरापासुन ते श्री शांताराम बारी यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| १५. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत शामराव कॉलनी श्री गणेश प्रोव्हिजन ते ललित काटकर यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| १६. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत आशाबाबा नगर येथील श्री सोपान सखाराम पाटील यांच्या घरापासुन ते श्री विजय महाजन यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| १७. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत आशाबाबा नगर येथील श्री विजय भोई यांच्या घरापासुन ते श्री देवरे यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| १८. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत आशाबाबा नगर येथील गट नं.८६/०२ गणेश पार्क परिसरातील कॉक्रिट रस्ते तयार करणे |
| १९. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत ॲड देविका आर पाटील यांच्या घरापासुन ते गणेश डिवाईन रस्त्या पर्यंत रस्ता तयार करणे |
| २०. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत पंडितराव कॉलनी येथील हनुमान मंदिरापासुन ते सौ. भारती पाटील यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| २१. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत आशाबाबा नगर येथील श्री गणेश बडगुजर यांच्या घरापासुन ते श्री सदगुरु जनरल स्टोर पर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| २२. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत आशाबाबा नगर मोबाईल टॉवर येथील श्री दयाराम एकनाथ काकडे ते श्री रमेश भोगावकर यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| २३. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत आशाबाबा नगर येथील श्री प्रभाकर वसंत मोरे यांच्या घरापासुन ते श्री पांडुरंग लोखंडे यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| २४. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत आशाबाबा नगर येथील श्री संदीप रामू पाटील यांच्या घरापासुन ते रेल्वे लाईन पर्यंत जाणारा कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| २५. | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत गट नं.४६७/२अ/१ परिजात कॉलनी येथील श्री ज्ञानदेव लोखंडे यांच्या घरापासुन ते श्री रमेश पालवे यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| २६. | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत गट नं.४६७/२अ परिजात कॉलनी येथील श्री राहुल वाघ यांच्या घरापासुन ते श्री जितेंद्र बडगुजर यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| २७. | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत गट नं.४६३/१+२ संभाजी नगर, देवेंद्र नगर वरुण पाणी जार फॅक्टरी श्री सचिन सपकाळे प्लॉट नं.०७ यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |

| | |
|---|---|
| २८. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत निमखेडी शिवार गट नं.१२१/अ/३ प्लॉट १३ ते प्लॉट २० पर्यंत रस्ता कॉक्रिटीकरण करणे |
| २९. | प्रभाग क्रं.०१ अंतर्गत गट नं.३७० के सी पार्क परिसरातील येथील श्री टेमकर यांच्या घरासमोरील रस्ता व यांच्या पाठीमागील कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ३०. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत महालक्ष्मी पार्क येथील श्री पंडित चौधरी यांच्या घराजवळील व परिसरातील कॉक्रिट रस्ते तयार करणे |
| ३१. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत काशिनाथ नगर ते माधव नगर पर्यंत मुख्य कॉक्रीट रस्ता तयार करणे |
| ३२. | प्रभाग क्रं.०६ अंतर्गत सिक्कल घर श्री राजू भागवत शिंदे कासमवाडी ते गणेश मराठे जवळ कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ३३. | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत दौलत नगर येथील सुदर्शन हौसिंग सोसायटी मधील गुरुकृपा डेअरी ते खंबायत क्लासपर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ३४. | प्रभाग क्रं.०१ अंतर्गत गट नं.३४२ शिवाजी नगर येथील दत्त कॉलनी मधील श्री आप्पा घागडे यांच्या घरापासुन ते श्री अरुण सुर्यवंशी यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ३५. | प्रभाग क्रं.०२ अंतर्गत शिवाजी नगर येथील क्षत्रिय मराठा मंगल कार्यालय पासून ते श्री मोहन तिवारी यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ३६. | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत ज्ञानदेव नगर येथील सुनंदिनी पार्क परिसरातील कॉक्रिट रस्ते तयार करणे |
| ३७. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत खेडी परिसरातील राज वाईन शॉप पासुन कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ३८. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत सागर नगर येथील गट नं.७०/१/३ परिसरातील कॉक्रिट रस्ते तयार करणे |
| ३९. | प्रभाग क्रं.०२ अंतर्गत श्री प्रशांत सावंत यांच्या घरापासुन ते अहिल्याबाई होळकर उदयान पर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ४०. | प्रभाग क्रं.०२ अंतर्गत श्री सुभाष ठाकरे यांच्या घरापासुन ते गाडगीळ पर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ४१. | प्रभाग क्रं.०२ अंतर्गत जय विजय चौक ते दिगंबर पोळ यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ४२. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत धनश्री मेडिकल ते श्री अभिमान सपके यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ४३. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत गट.नं.१३० श्री नारायण पार्क ते जुना खेडी रोड पर्यंत रस्ता तयार करणे |
| ४४. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत गट नं.१२९ श्री अजय खडके यांच्या घरापासुन ते श्री दिलीप महाजन यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ४५. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत गट नं.५०/२/अ श्रीराम नगर परिसरातील कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ४६. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत गट नं.११८/६ द्वारका नगर येथील प्लॉट नं.५१ परिसरातील कॉक्रिट रस्ते तयार करणे |
| ४७. | प्रभाग क्रं.१७ अंतर्गत गट नं.४८/१ ओमसाईराम नगर परिसरातील खेडी पेट्रोल पंपाच्या मागिल कॉक्रिट रस्ते तयार करणे |
| ४८. | प्रभाग क्रं.१७ अंतर्गत खेडी येथील राष्ट्रीय महामार्ग क्रं.०६ पासुन ते कामधेनु नगर येथील छोरीया दाल मिल मागील बाजु पर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ४९. | प्रभाग क्रं.११ अंतर्गत श्री डॉ संजय काळे यांच्या घरापासुन ते नवनाथ मंदिर पर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ५०. | प्रभाग क्रं.११ अंतर्गत श्री हर्षल सुर्यवंशी यांच्या घरापासुन ते दुर्गा माता मंदिर पर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ५१. | प्रभाग क्रं.१६ अंतर्गत ढाकेवाडी येथील गट नं.५०७/अ श्री कृष्ण मंदिर परिसरातील श्री नारखेडे सर यांच्या घराजवळील कॉक्रिट रस्ते तयार करणे |
| ५२. | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत श्री अमित पाटील रेशन दुकान पासुन ते डॉ वाणी यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ५३. | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत जयराम हाईट अपार्टमेंन्ट ते क्षीरसागर यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ५४. | प्रभाग क्रं.१६ अंतर्गत गट नं.५१६/१ प्लॉट नं.०१ ते प्लॉट नं.२४ पर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ५५. | प्रभाग क्रं.१७ अंतर्गत रिगल प्लाझा पासुन ते सिध्दिविनायक शाळेपर्यंत व तेथुन कृपा सिध्दू पर्यंत कॉक्रिट रस्ते तयार करणे |
| ५६. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत भिकमचंद जैन नगर येथील गट नं.२९२ व २९३ परिसरातील कॉक्रिट रस्ते तयार करणे |
| ५७. | प्रभाग क्रं.१० अंतर्गत गट नं.१९४/२ गणेश विहार, पिंप्राळा शिवार श्री वरद अपार्टमेंन्ट पासुन ते गणेश विहार ओपनस्पेस पर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ५८. | प्रभाग क्रं.१७ अंतर्गत गट नं.५८/७ लक्ष्मी नारायणनगर परिसरातील अंतर्गत कॉक्रिट रस्ते तयार करणे |
| ५९. | प्रभाग क्रं.१० अंतर्गत साई कल्पना रेसीडेन्सी गणपतीनगर, पिंप्राळा परिसरातील कॉक्रिट रस्ते तयार करणे |
| ६०. | प्रभाग क्रं.११ अंतर्गत गट नं.४१ रुक्मिणीनगर येथील किस्मत हेयर आर्ट ते चैतन्य महादेव मंदिर मुख्य कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ६१. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत श्रीराम समर्थ कॉलनी गट नं.१०५ निमखेडी शिवार येथील पी.वि.सांळुखे ते गुलाब पाटील यांच्या घरापर्यंत व पुढे श्री सपकाळे यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ६२. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत दादावाडी जैन मंदिरापासुन ते वाघेश्वरी किराणा पर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ६३. | प्रभाग क्रं.१० अंतर्गत गट नं.१९१,१९२,१९३ अंतर्गत विलास पाटील ते उदय बडगुजर यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ६४. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत इंद्रनील सोसायटी येथील पाटील काका ते सोनवणे यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ६५. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत गुरुदत्त उदयान पासुन मयुरेश प्लाझा अपार्टमेंट पर्यत कॉक्रिट रस्ता तयार करणे |

| | |
|---|---|
| ६६. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत गट नं.५३,५४/१,५४/२,५५,५९ व ६० मधील कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ६७. | प्रभाग क्रं.०६ अंतर्गत टागोर नगर परिसरातील कॉक्रिट रस्ते तयार करणे |
| ६८. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत बाळु तांबे ते विलास पाटील यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ६९. | प्रभाग क्रं.१२ अंतर्गत अनुराग स्टेट बॅक कॉलनी, विजय घुगे ते संजय पाटील यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ७०. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत श्री गोकुळ पाटील ते गणेश वडनेरे यांच्या घरापर्यंत (गोकर्ण महादेव मंदिर) कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ७१. | प्रभाग क्रं.१७ अंतर्गत शांतीनिकेतन परिसरातील कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ७२. | प्रभाग क्रं.१७ अंतर्गत अयोध्या नगर येथील हनुमान मंदिर समोरील रस्ता,गणपती मंदिर ते महादेव मंदिर ते जांगीड सभागृह परिसरातील कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ७३. | प्रभाग क्रं.१९ अंतर्गत सुप्रीम कॉलनी येथील शारदा शाळेजवळील अंतर्गत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ७४. | प्रभाग क्रं.१० अंतर्गत पोलीस चौकी ते जाकीर पठाण ते बिलाला चौक पर्यंत अंतर्गत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ७५. | प्रभाग क्रं.१० अंतर्गत जहीर पठाण ते महेंद्र पुजावाले व अयुब ते शेख रईस यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ७६. | प्रभाग क्रं.११ अंतर्गत मुंदडा नगर गट नं.१०१/३ सुनील माने यांच्या घराजवळ संरक्षक भिंत व कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ७७. | प्रभाग क्रं.१७ अंतर्गत रोनक कॉलनी यशवंत पाटील ते पित्रोला पर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ७८. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत पिंप्राळा गट नं.१/२ परिसरातील कॉक्रिट रस्ते तयार करणे |
| ७९. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत गट नं.२९५ भोईटेनगर परिसरातील कॉक्रिट रस्ते तयार करणे |
| ८०. | प्रभाग क्रं.१६ अंतर्गत सालार नगर ते हॉटेल मानस लगतचा कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ८१. | प्रभाग क्रं.१० अंतर्गत नर्मदेश्वर महादेव मंदिर, सेंन्ट्रल बॅक कॉलनी गट नं.१९०/४ येथे कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ८२. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत डॉ.नारखेडे ते गणेश कॉलनी चौकापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ८३. | प्रभाग क्रं.१० अंतर्गत शेगाव संस्थान गल्ली, हुडको प्रल्हाद नगर, पिंप्राळा हेमंत जोशी यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ८४. | प्रभाग क्रं.१४ अंतर्गत येथील गणपती नगर परिसरातील कॉक्रिट रस्ते तयार करणे |
| ८५. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत येथील खोटेनगर पाण्याच्या टाकीपासून ते निमखेडी रस्त्यापर्यंत कॉक्रिट रस्ते तयार करणे |
| ८६. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत गुड्डूराजा नगर, हर्ष गिरी अपार्टमेन्ट ते सपकाळे यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ८७. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत गौरी क्लासिक अपार्टमेंन्ट ते महेश श्रीनिवास पाटील यांचे घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ८८. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत जिव्हाळा नर्सिग होम ते सुरवाडे यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ८९. | प्रभाग क्रं.१२ अंतर्गत व्यंकटेश कॉलनी परिसरातील रस्ते कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ९०. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत एक्सिस बॅंकेपासुन शिवगणेश मंदिरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ९१. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत कल्पतरु हाईटस ते कार ग्यारेज पर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ९२. | प्रभाग क्रं.१७ अंतर्गत एम एस ई बी सबस्टेशन ते नाल्यापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ९३. | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत मोहाडी ते गौरी हेरिटेज पर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |
| ९४. | प्रभाग क्रं.१७ अंतर्गत प्रगती हाईटस ते श्री यादव यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे |

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**